सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १६ जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ९३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## शेतकऱ्यांचे ४८ हजार कोटींचे थकीत वीजबिल माफ





तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांची दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, महायुती सरकारने आता बळीराजाला आणखी एक मोठा दिलासा दिला आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे साडेसात अश्र्वशक्ती पर्यंतचे तब्बल ४८ हजार कोटी रुपयांचे जुने थकीत वीज बिल पूर्णपणे माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केली.

शेतकऱ्यांची पाटी पूर्णपणे कोरी झाली पाहिजे आणि त्याच कोऱ्या पाटीवर आपल्याला महाराष्ट्राचा नवा इतिहास लिहिता आला पाहिजे, याच एका ध्येयाने आम्ही हा धाडसी निर्णय घेतला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील लाखो शेतकऱ्यांवरील थकीत बिलांचे संकट कायमचे दूर केले.यशवंतराव चव्हाण सेंटर येथे भाजप किसान मोर्चातर्फे आयोजित 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'बद्दलच्या कृतज्ञता सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी कृषी मंत्री दत्ता भरणे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार संजय कुटे यांच्यासह राज्यातील विविध भागांतून आलेले शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी वीज बिल माफीच नव्हे, तर राज्यातील १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देण्याची आणि कर्जमाफीतील जाचक अटी पूर्णपणे रद्द करण्याची घोषणा केली.शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सरकारने उचललेल्या पावलांची माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले, साडेसात अश्र्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे सध्याचे वीज बिल सरकारने आधीच माफ केले आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या नावावर जुनी थकीत बिले कागदोपत्री तशीच असल्याने नवीन वीज कनेक्शन घेताना किंवा इतर कामांत त्यांना अडचणी येत होत्या. ही टांगती तलवार दूर करण्यासाठी आम्ही ४८ हजार कोटींचे थकीत वीज बिल माफ करण्याचा निर्णय घेतला. या वीज बिल माफीचा बोजा सर्वसामान्यांच्या बिलावर पडू नये, म्हणून राज्य सरकार दरवर्षी अर्थसंकल्पातून तब्बल २५ हजार कोटी रुपये वीज वितरण कंपनीला (महावितरण) देत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.रात्रीच्या वेळी शेतात पाणी देताना शेतकऱ्यांना सर्पदंश आणि अन्य जीवघेण्या संकटांना सामोरे जावे लागते. या त्रासातून शेतकऱ्यांची कायमची मुक्तता करण्यासाठी सरकारने 'सौर कृषी वाहिनी' आणि 'सौर पंप' योजना गतीने राबवली आहे. सध्या ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जात असून, या वर्षाअखेरपर्यंत हे प्रमाण १०० टक्क्यांवर नेण्याचे आणि शेतकऱ्यांना दिवसा ८ ते १२ तास पूर्णपणे मोफत वीज देण्याचे आश्र्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

## चिमुकलीची हत्या

रायगड : रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील पाटणेश्र्वर आदिवासी वाडी येथे पाच वर्षीय चिमुकलीचे अपहरण करून तिची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

या घटनेमुळे संपूर्ण पेण तालुक्यात हळहळ आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी पेण पोलिसांनी एका २४ वर्षीय संशयिताला ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. शोधमोहीमेदरम्यान घरापासून सुमारे १०० मीटर अंतरावरील शेत परिसरात चिमुकलीचा मृतदेह आढळून आला. ही माहिती समोर येताच गावात एकच खळबळ उडाली. घटनास्थळी मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती.

## MPSC ऑनलाईन परीक्षा पद्धतीला तूर्तास स्थगिती

तभा वृत्तसेवा

पुणे: महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीच्या परीक्षा पद्धतीसंदर्भात विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुण्यातील स्पर्धा परीक्षार्थींच्या शिष्टमंडळाची बैठक पार पडली.

यामध्ये सद्यःस्थितीत ऑनलाइन परीक्षा पद्धती विद्यार्थ्यांवर लादली जाणार नाही, तसेच भविष्यात ऑनलाइन परीक्षा घेण्याचा विचार झाला तर सर्व स्पर्धा परीक्षा एकाच वेळी त्या पद्धतीने घेता येईल, अशी सक्षम व विश्र्वासार्ह यंत्रणा उभारल्यानंतरच त्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे आश्र्वासन फडणवीस यांनी शिष्टमंडळाला दिले. मुख्यमंत्र्यांच्या आश्र्वासनानंतर पुण्यातील स्पर्धा परीक्षार्थींनी आंदोलन करण्याचा निर्णय मागे घेतल्याचे स्पष्ट केले.

स्पर्धा परीक्षार्थींनी दिलेल्या माहितीनुसार, फडणवीस यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनंतर १७ जुलैपर्यंत सुरू असलेल्या संयुक्त पूर्व परीक्षा (गट 'क') अर्ज प्रक्रियेबाबतही पुनर्विचार केला जाईल. तसेच, विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन सद्यःस्थितीत ऑनलाइन परीक्षेचा निर्णय स्थगित करण्याबाबत सकारात्मक आश्र्वासन दिले आहे.

तसेच, एमपीएससी अध्यक्ष व सचिव यांच्यासोबतची बैठक झाल्यानंतर विद्यार्थी प्रतिनिधींसोबत पुन्हा बैठक घेण्यात येणार असून, त्यामध्ये पुढील भूमिका आणि निर्णयाची सविस्तर माहिती जाहीर करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. या वेळी आमदार अभिमन्यू पवार, भाजपचे सरचिटणीस राजेश पांडे आणि राज देशमुख यांनीही विद्यार्थ्यांची भूमिका प्रभावीपणे मांडली.

## व्यावसायिकाचा बळी

भोपाळ : गुप्तधनाच्या लालसेपोटी व्यावसायिकाचा बळी देण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. विजय जैन यांच्या कुटुंबियांनी ते बेपत्ता झाल्याची तक्रार ९ जुलैला नोंदवली होती. यानंतर पोलीस तपास सुरू झाला. १३ जुलैला त्यांचं शव नदी किनारी सापडलं. शव मिळाल्यानंतर काही तासांत पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा केला. ही घटना मध्य प्रदेशच्या रायसेनमध्ये घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काही ग्रामस्थ बकऱ्या घेऊन नदीच्या काठावर गेले होते. बकऱ्या चरत असताना त्यांना तिथे कुत्रे जोरजोरात भुंकताना दिसले. कुत्रे एकाच जागी बराच वेळ उभे होते. यानंतर ग्रामस्थांनी तिथे जाऊन पाहिलं असता जमिनीतून एक पाय बाहेर आलेला त्यांना दिसला. याची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी नदीच्या काठावर येऊन खोदकाम केलं. काही मिनिटांतच शव सापडलं. त्याची ओळख पटवण्यात आली. शव विजय जैन यांचं होतं.

## कर्जमाफीवरून पंकजा मुंडेंनी विरोधकांना सुनावले



तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीवरून आणि निधी वितरणावरून विरोधकांकडून होत असलेल्या टीकेला भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. अधिवेशनात किंवा कॅबिनेटमध्ये घोषणा झाल्याच्या दुसऱ्याच मिनिटाला शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे कसे काय जमा होणार? ही एक कायदेशीर आणि प्रशासकीय सरकारी प्रक्रिया असते, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. तसेच चालू जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत शेतकऱ्यांचे सर्व प्रश्र्न सुटतील, असा ठाम विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

कर्जमाफीच्या तांत्रिक बाबींवर बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, हे सरकार असून अत्यंत भव्य प्रमाणात निधीचे वाटप केले जाणार आहे. यामध्ये राज्यातील असंख्य शेतकरी बांधव समाविष्ट असून, त्यांच्या जमिनी आणि कर्जाचे मूल्यांकन करावे लागते. कोणतीही मोठी योजना थेट राबवताना तिची पडताळणी करणे गरजेचे असते. एखादा मोठा निर्णय घेतला की लगेच 'अजून पैसे आले नाहीत' म्हणून ओरड करणे चुकीचे आहे. एवढ्या गतीने आणि पारदर्शक पद्धतीने काम करण्याची सवय महाराष्ट्रात आमच्याच महायुती सरकारने लावली आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

कॅबिनेट बैठकीतील घडामोडींचा हवाला देत पंकजा मुंडे यांनी सांगितले की, नुकतीच या संदर्भात सविस्तर बैठक पार पडली असून, महायुतीचे नेते यावर लक्ष ठेवून आहेत. हा निर्णय नुकत्याच झालेल्या अधिवेशनात घेण्यात आला आहे आणि प्रशासन युद्धपातळीवर काम करत आहे.

## लोकसभेच्या सरसकट ५० टक्के जागा वाढवल्यास पाठिंब्याबाबत विचार करू



तभा वृत्तसेवा

मुंबई : लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत केंद्र सरकारने अद्याप नवीन विधेयकाचा मसुदा समोर आणलेला नाही. त्यामुळे या प्रक्रियेचे निकष आणि नेमके सूत्र स्पष्ट झाल्याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष कोणताही अंतिम निर्णय घेणार नाही. तथापि, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व राज्यांमध्ये लोकसभा जागा सरसकट ५० टक्क्यांनी वाढवण्याचा आमचा जुना प्रस्ताव सरकारने मान्य केला आणि कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नसेल, तर आम्ही या विधेयकाला पाठिंबा देण्याबाबत विचार करू, अशी भूमिका खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी मांडली. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. सुळे म्हणाल्या, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत विरोधी पक्षांची चर्चा झाली. त्या बैठकीत लोकसंख्येच्या आधारावर पुनर्रचना केल्यास दक्षिणेकडील राज्यांवर अन्याय होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. त्यावर सर्व राज्यांमधील जागा सरसकट ५० टक्क्यांनी वाढवण्याचा प्रस्ताव सरकारने ठेवला होता. मात्र प्रत्यक्ष मसुद्यात ती अट टाकली गेली नाही.

त्यामुळे आता नवे विधेयक प्रत्यक्ष समोर आल्यानंतर, त्याचा २४ तासांत अभ्यास करूनच पक्ष आपली अधिकृत भूमिका स्पष्ट करेल. या विषयावर आपली राहुल गांधी आणि 'उबाठा'चे अरविंद सावंत यांच्याशीही सविस्तर चर्चा झाली असून 'इंडिया' आघाडी मिळून एकत्रित निर्णय घेईल, असे त्यांनी सांगितले.

## सर्वोच्च न्यायालयाची टिपण्णी

नवी दिल्ली :दोन पेक्षा जास्त अपत्य राहिल्यास संबधित व्यक्तीला राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढता येत नाही असा नियम आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. गेल्या अनेक दशकांपासून हा निर्णय लागू आहे. दोन पेक्षा जास्त अपत्य असणाऱ्या एखाद्या उमेदवाराने प्रशासनाची दिशाभूल केली आणि उमेदवारी अर्ज दाखल केला, आणि निवडणूक जिंकली तरी नंतर संबंधित पद धोक्यात येतं. विरोधकांनी याबाबत तक्रार केली किंवा प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आली तर संबंधित निवडून आलेला उमेदवार अपात्र ठरतो, असा नियम आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपंचायत, महापालिकांच्या निवडणुकांसाठी हा नियम आहे.

## आयात खर्च कमी करण्यासाठी पर्यायी इंधनांना पाठिंबा : नितीन गडकरी



वृत्तसंस्था

नवी दिल्ली: भारतात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या धोरणामुळे सध्या मोठा वाद निर्माण झाला आहे. ए-२० पेट्रोलमुळे वाहनांच्या इंजिनचं नुकसान होत असून मायलेज कमी होत असल्याची लोकांची तक्रार आहे. इथेनॉल मिश्रित पेट्रोलला पाठिंबा देण्यावरून हितसंबंधांचा संघर्ष आणि वैयक्तिक फायद्याचे आरोप केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी फेटाळून लावले आहेत. ते म्हणाले की, 'वाहनांमुळे होणारे प्रदूषण आणि भारताचा आयात खर्च कमी करण्यासाठी त्यांनी नेहमीच पर्यायी इंधनांना पाठिंबा दिला आहे'. नितीन गडकरीपुढे म्हणाले की, हे आरोप 'राजकीय हेतूने केले जात आहेत', असं गडकरी म्हणाले.

त्यांनी वृत्तसंस्थेला ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं की, 'इथेनॉलमध्ये त्यांच्या मुलांचा व्यवसायाचा वाटा कमी असून एकूण नफ्यात त्यांचे योगदान नगण्य आहे'. शिवाय ते म्हणाले की, 'या व्यवसायावर १,६०० कोटी रुपयांचं कर्ज आहे आणि त्यांचा या व्यवसायाशी किंवा त्याच्या खरेदीशी कोणताही संबंध नाही'.'इथेनॉल मिश्रित पेट्रोलसाठीचा वादवाजपेयी सरकारच्या काळापासूनचा आहे आणि त्याला यूपीए शासनाचाही पाठिंबा होता. तसेच तत्कालीन तेल मंत्री मणिशंकर अय्यर यांनी संसदेत त्याचं समर्थन केलं होतं'. पुढे त्यांनी असा दावा केला की, त्यांनी केवळ उसापासून मिळणाऱ्या इथेनॉललाच नव्हे, तर मका, पिकांचे अवशेष आणि बांबूपासून मिळणाऱ्या इथेनॉललाही पाठिंबा दिला आहे. इतकेच नव्हे, तर त्यांनी मिथेनॉल, हायड्रोजन आणि इलेक्ट्रिक वाहनांसह इतर सर्व प्रकारच्या पर्यायी इंधनांनाही प्रोत्साहन दिलं आहे.गडकरी पुढे म्हणाले की, 'सोशल मीडियावरच्या दाव्यांमध्ये तथ्य नाही. तिथे मोठ्या प्रमाणावर दिशाभूल केली जात आहे. महामार्गांवर गाडी चालवताना इंधन कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे', हे त्यांनी मान्य केलं असलं तरी, वाहनांच्या इंजिनचं नुकसान होत असल्याचा दावा त्यांनी फेटाळून लावला. 'मारुतीसारख्या कार उत्पादकांनाही कोणताही परिणाम दिसून आलेला नाही', असं ते यावेळी म्हणाले. त्यांच्या आणि सरकारच्या विरोधात चुकीच्या माहितीचा शस्त्र म्हणून वापर केला जात आहे. 'टाइम्स ऑफ इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी आणि कच्च्या तेलाच्या आयातीवरील भारताचं अवलंबित्व कमी करण्यासाठी इथेनॉल-मिश्रित पेट्रोल, मिथेनॉल, हायड्रोजन आणि इलेक्ट्रिक वाहने यांसारख्या पर्यायी इंधनांना प्रोत्साहन देण्याच्या आपल्या प्रयत्नांचं समर्थन केलं.'माझ्यावर होणाऱ्या टीका-टिपण्णी या सर्व राजकीय हेतूने केल्या जात आहेत. काही विशिष्ट लोक मला आणि सरकारला लक्ष्य करत आहेत. ए-२० इंधनामुळे इंजिनचं नुकसान होतं, अशी चुकीची माहिती देखील पसरवली जात आहे. ए-२० इंधन वापरण्यासाठी सर्व वाहनं योग्य आहेत. इंधनामुळे इंजिनचं नुकसान होत असल्याबद्दल आतापर्यंत कोणतीही तक्रार आलेली नाही. असंही त्यांनी यावेळी स्पष्टपणे सांगितलं.







## झाड अंगावर कोसळून मृत्यू

तभा वृत्तसेवा

ठाणे : ठाण्यातील लुईसवाडी सेवा रस्त्यानजीकच्या ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर झाड अंगावर कोसळून गंभीर जखमी झालेल्या पांडुरंग भुवड यांचा गेल्या आठवड्यात रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर भुवड कुटुंबियांना स्थानिक नगरसेवक आणि ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तातडीची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. तसेच ठाणे पालिकेच्या उपायुक्तांनी एक महिन्यांचे वेतन देत भुवड कुटुंबाला मदतीचा हात दिला.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयानजीक धर्मवीर नगर येथे राहणारे पांडुरंग भुवड हे सोमवार, ६ जून रोजी नळ दुरुस्तीच्या कामासाठी चालत जात होते. यावेळी जोरदार पाऊस आणि सोसाट्याचा वारा सुरु झाल्याने आरटीओ कार्यालयासमोर एका झाडाच्या आडोशाला भुवड उभे असतानाच त्यांच्यावर झाड कोसळले. त्यांना तात्काळ नजीकच्या खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले.पांडुरंग भुवड यांच्या कुटुंबाला शिवसेनेचे स्थानिक नगरसेवक विकास रेपाळे आणि नम्रता भोसले - जाधव यांनी ५ लाख रुपयांची तसेच ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करून शासनाकडून मंजूर झालेली ४ लाख अशी एकूण ९ लाख रुपयांची तातडीची आर्थिक मदत सुपूर्द केली.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जिल्हा परिषद प्रशाला शाळा सोयगाव येथे व्यसनमुक्ती पंधरवडा निमित्ताने कार्यक्रम संपन्न



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१५ जुलै :** जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे बुधवार रोजी व्यसनमुक्ती पंधरवडा निमित्ताने समाज प्रबोधनकार विष्णू मापारी सोयगावकर यांचा व्यसनमुक्ती व बालविवाह प्रतिबंध या विषयांवर कार्यक्रम संपन्न झाला.त्यांनी विद्यार्थांना व्यसनाचे दुष्परिणाम सांगुन व्यसनमुक्त समाज निर्मिती महत्वाचे आहे,बालविवाह केल्यामुळे होणारे दुष्परिणाम सांगुन,मुला-मुलींमध्ये भेद नको असा महत्वाचा संदेश दिला.शेवटी व्यसनमुक्तीची शपथ घेण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड यांनी समाज प्रबोधनकार विष्णू मापारी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.या कार्यक्रमात विद्यार्थी यांचेसह शाळेचे सर्व शिक्षक,शिक्षिका उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दौलतसिंग परदेशी यांनी केले तर आभार प्रदर्शन भास्कर चौधरी यांनी मानले.

## विद्यार्थ्यांना बेदम मारहाण करणाऱ्या 'त्या' शिक्षकाची अखेर बदली

### गंगापूर येथील" न्यू हायस्कूल "शाळेतील गंभीर प्रकार

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.१५ :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील न्यू हायस्कूल गंगापूर या शाळेतील विद्यार्थ्यांना वर्गात बडबड केल्याच्या कारणावरून नववीतील विद्यार्थ्यांना हात फुटेपर्यंत बेदम मारहाण करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना बेदम मारहाण करणाऱ्या न्यू हायस्कूल गंगापूर येथील वादग्रस्त शिक्षक ए. यु. साळुंके यांच्यावर अखेर प्रशासनाने कारवाई केली आहे. साळुंके यांची संस्थेने बदली केली असून, १३ जुलै रोजी त्यांना शाळा प्रशासनातर्फे अधिकृतपणे कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या जागी शाळेत नवीन शिक्षक रुजू झाले आहेत.

विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण

काही दिवसांपूर्वी न्यू हायस्कूल गंगापूर येथे वर्गात बडबड केल्याचे निमित्त करून शिक्षक ए. यु. साळुंके यांनी समर्थ सोनवणे आणि भार्गव जोशी या नववीतील दोन विद्यार्थ्यांना अमानुषपणे मारहाण केली होती. या मारहाणीत विद्यार्थ्यांचे हात सुजले होते. या घटनेनंतर समर्थ सोनवणे याचे पालक प्रा. सुनील वाघमारे आणि भार्गव जोशी यांचे पालक गणेश पुराणिक यांनी तातडीने पोलीस ठाण्यात



धाव घेतली होती. जखमी विद्यार्थी समर्थ याच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचारही करण्यात आले. विद्यार्थ्यांना झालेल्या बेदम मारहाणीचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध होताच गंगापूर परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. शाळा प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात गावकरी आणि पालकांमध्ये मोठा रोष निर्माण झाला होता. पालकांनी संबंधित शिक्षकावर गुन्हा दाखल करण्याची तयारी केली होती. मात्र, शाळा प्रशासनाने साळुंखे यांच्यावर तातडीने बदलीची कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यामुळे पालकांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया तात्पुरती स्थगित ठेवली होती.

मुख्यालयात रवानगी; नवीन शिक्षक रुजू.

स्थानिक ग्रामस्थांचा वाढता दबाव आणि रोष लक्षात घेऊन शाळा प्रशासनाने अखेर १३ जुलै रोजी शिक्षक ए. यु. साळुंके यांना शाळेतून कार्यमुक्त केले. संस्थेकडून बदलीचा अंतिम आदेश प्राप्त होईपर्यंत त्यांना तात्पुरते संस्थेच्या मुख्य कार्यालयात (मुख्यालय) हजर राहण्याचे आदेश देण्यात आले

## शिवाजी महाविद्यालयात एनसीसीचे प्लास्टिकमुक्त परिसर अभियान; 45 कॅडेट्सचा उत्स्फूर्त सहभाग



**कन्नड :**दि.१५ जुलै - पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) विभागाच्या वतीने दि.१४ रोजी महाविद्यालय परिसरात प्लास्टिक संकलन व निर्मूलन अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात ४५ एनसीसी कॅडेट्सनी सक्रिय सहभाग घेत परिसर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी श्रमदान केले.

अभियानादरम्यान कॅडेट्सनी महाविद्यालय परिसराची स्वच्छता करून रिकाम्या प्लास्टिकच्या बाटल्या, वेफर्स व इतर खाद्यपदार्थांचे रॅपर्स, फूड पॅकिंगसाठी वापरण्यात आलेले प्लास्टिक, कॅरीबॅग्स तसेच इतर प्लास्टिक कचरा गोळा केला. संकलित करण्यात आलेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

या उपक्रमामुळे परिसर स्वच्छ होण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिक प्रदूषणाचे दुष्परिणाम, स्वच्छतेचे महत्त्व आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती झाली. तसेच एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकला पर्याय स्वीकारून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करण्याचा निर्धार कॅडेट्सनी व्यक्त केला. हा उपक्रम प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच एनसीसी अधिकारी लेफ्टनंट डॉ. विजय मातकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

## सोयगाव बस आगारात 78 व्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षरोपण संपन्न

**सोयगाव,दि.१५ जुलै :** राज्य परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांच्या संकल्पनेतून आगारात दि.१४ मंगळवार रोजी माजी सरपंच नंदाताई आगे आमखेडा यांच्या हस्ते बस आगारात वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी आगार प्रमुख मनिष जवळेकर,सहाय्यक वाहतूक निरीक्षक कैलास बागुल,लिपिक सतीश पाटील,विनोद जाधव,वर्जन जाधव, अशोक तायडे,संतोष पाखरे,मधुकर आमटे सह चालक,वाहक, व यांत्रिक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रातील सर्वात जिव्हाळ्याची परंपरा

**मुंबई :** पंढरपूर वारीत सहभाग घेत जेमिनीने महाराष्ट्रातील स्थानिक समुदायांशी आपले नाते अधिक दृढ केले आहे आणि राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा सन्मान केला आहे. या उपक्रमावर भाष्य करताना, सीनिअर डायरेक्टर, गो-टू-मार्केट रिटेल, कारगिल फूड साऊथ आशिया, शैलेश खुराणा म्हणाले: "अनेक दशकांपासून महाराष्ट्र हे जेमिनीचे घर राहिले आहे आणि गेल्या अनेक वर्षांत इथल्या घराघरांचा एक महत्त्वाचा भाग बनण्याचा बहुमान आम्हाला मिळाला आहे. पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रातील सर्वात जिव्हाळ्याची परंपरा आहे, जी श्रद्धा, सेवा आणि सामाजिक एकतेचे उत्तम दर्शन घडवत लाखो भाविकांना एकत्र आणते. या वारीचा एक भाग होणे आणि पंढरपूरच्या वाटेवर भाविकांना मदत करणे हा आमचा सन्मान आहे. महाराष्ट्रातील जनता आणि समुदायांप्रती आमची बांधिलकी जपत, भाविकांचा हा प्रवास थोडा अधिक सुखकर करण्याची आमची इच्छा आहे.

## तुमच्या मनगटावर नवीन एआय-संचालित आरोग्य सोबती

एआय दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालले आहे, तसतसे मोबाईल डिवाईसेस त्यांची पूर्ण क्षमता जाणून घेण्यासाठी प्राथमिक प्रवेशद्वार म्हणून काम करत आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एआय आपल्या रोजच्या जीवनात अर्थपूर्ण पद्धतीने, विनासायासपणे, सहजपणे आणि खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरेल अशा प्रकारे समाविष्ट केले जाऊ शकते. आम्ही हा बुद्धिमान अनुभव आमच्या संपूर्ण परिसंस्थेमध्ये आणण्यावर लक्ष केंद्रित केले आहे, ज्यामध्ये गॅलेक्सी वॉच प्रगत आणि वैयक्तिकृत एआयसाठी आरोग्याला प्राधान्य देणारे, नेहमी सुरू राहणारे गेटवे म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. फक्त हे नवीन गॅलेक्सी वॉच परिधान केल्याने सहजपणे उत्तम आरोग्याचा संपूर्ण नवीन स्तर अनुभवता येऊ शकतो. गॅलेक्सी वॉच बॅकग्राउंडमध्ये सतत काम करते, ज्यामुळे सर्वसमावेशक आरोग्य सेवा तुमच्या दैनंदिन दिनचर्येचा भाग बनते.

## नथिंग फोन (4बी) विक्रीसाठी उपलब्ध

**नवी दिल्ली :** लंडनस्थित ग्राहक तंत्रज्ञान ब्रँड नथिंगने फोन (4बी) च्या विक्रीची घोषणा केली आहे. नवीन (बी) मालिकेतील हा पहिला स्मार्टफोन असून, नथिंग इकोसिस्टमचा अनुभव घेण्याचा हा सर्वात सोयीचा मार्ग आहे. 7.5% इन्स्टंट बँक डिस्काउंट आणि एक्सचेंज बोनससह, 8जीबी + 128जीबी व्हेरिएंटसाठी 29,999 रुपये आणि 8जीबी + 256जीबी व्हेरिएंटसाठी 33,699 रुपये या किमतीत हा फोन उपलब्ध असेल. 14 जुलै 2026 पासून 4बी फोन फ्लिपकार्ट तसेच क्रोमा, रिलायन्स डिजिटल आणि विजय सेल्स यासारख्या प्रमुख रिटेल भागीदारांकडे विक्रीसाठी उपलब्ध होईल.

## मेसर्स वीरम ऑटो व्हील्स डीलरशीपचे उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर, 13 जुलै 2026:** दुचाकी आणि तीनचाकी वाहन विभागातील आघाडीची जागतिक उत्पादक कंपनी टीव्हीएस मोटर कंपनीने आज छत्रपती संभाजीनगर येथे आपल्या अधिकृत डीलरशीप मेसर्स वीरम ऑटो व्हील्स च्या उद्घाटनाची घोषणा केली. या नव्या सुविधा केंद्रामुळे या भागातील टीव्हीएस मोटर कंपनीचे रिटेल स्थान अधिक बळकट झाले असून ग्राहकांपर्यंत सहज पोहोच आणि उत्कृष्ट ग्राहक अनुभव सादर करण्याच्या कंपनीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अधिक चालना मिळाली आहे.

## पर्यावरणीय पुनर्संचयितीकरणाला बळ

**बेंगळुरू, 14 जुलै 2026:** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने बाणेरघट्टा जैविक उद्यानाच्या शाकाहारी सफारी विभागातील 10 हेक्टर क्षेत्रातील पर्यावरणीय पुनर्संचयितीकरण प्रकल्प कर्नाटक प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाकडे सुपूर्द केला. हा उपक्रम टीकेएम च्या हार्मनी विथ नेचर – ग्रीन वेव्ह प्रकल्पांशी सुसंगत असून जैवविविधता संवर्धन आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठीच्या कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी (सीईआर) अंतर्गत राबविण्यात आला आहे.हा प्रकल्प श्री. ए. व्ही. सूर्य सेन, आयएफएस, कार्यकारी संचालक, बाणेरघट्टा जैविक उद्यान, श्री. ए. रमेश राव, उपाध्यक्ष – एक्स्टर्नल अफेअर्स, टोयोटा किर्लोस्कर मोटर, टीकेएम चे वरिष्ठ अधिकारी तसेच बाणेरघट्टा जैविक उद्यानातील इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आला.

## कौशल्य विकास आणि जीवनव्यापन सुधारणा उपक्रम

मुंबई, १५ जुलै, २०२६- जागतिक युवा कौशल्य दिन च्या निमित्ताने एचडीएफसी बँक परिवर्तन या एचडीएफसी बँकेच्या सीएसआर उपक्रमाअंतर्गत युवकांची कौशल्ये, ज्ञान आणि संधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रयत्नांना अधोरेखित करण्यात येत असून भारताच्या सध्याच्या बदलत्या अर्थव्यवस्थे मध्ये या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. सुरुवातीपासूनच बँकेच्या कौशल्यवृध्दी आणि जीवनव्यापन कार्यक्रमांनी ९.६ लाख लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम घडवला आहे. एचडीएफसी बँकेच्या परिवर्तन चा दृष्टिकोन हा कौशल्य विकासाची औपचारिक, प्रमाणनावर आधारीत प्रशिक्षण देऊन जीवनव्यापन आणि व्यावसायिक प्रशिक्षण हे स्थानिक स्तरानुसार आहे. त्यांच्या बाजारपेठेतील भागीदार आणि एनएसडीसी प्रमाणित संस्थांच्या सहकार्याने विविध प्रमाणन कार्यक्रमांच्या माध्यमातून १.९६ लाख तरुणांना विविध क्षेत्रातील औपचारिक प्रशिक्षण दिले जाते.

## छत्रपती संभाजीनगरात व्होक्सवॅगनची नवी डीलरशिप; महाराष्ट्रातील जाळे आणखी मजबूत

### एका दिवसात 10 कार्सची मेगा डिलिव्हरी; पहिल्या 50 ग्राहकांना एक वर्षाचे मोफत सर्व्हिस व्हॅल्यू पॅकेज

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** प्रीमियम जर्मन वाहन उत्पादक कंपनी व्होक्सवॅगन इंडियाने छत्रपती संभाजीनगर येथे नव्या डीलरशिपचे उद्घाटन करून महाराष्ट्रातील आपले विक्री व सेवा जाळे आणखी विस्तारले आहे. या उद्घाटनानंतर राज्यातील व्होक्सवॅगनचे नेटवर्क 17 सेल्स लोकेशन्स आणि 16 सर्व्हिस आउटलेट्सपर्यंत पोहोचले आहे. शहरातील वाढत्या प्रीमियम वाहनांच्या मागणीला प्रतिसाद देत ग्राहकांना आधुनिक सुविधा आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा विस्तार करण्यात आला आहे.

मुकुंदवाडी येथील नव्या शोरूममध्ये



व्होक्सवॅगनच्या चार प्रमुख मॉडेल्सचे प्रदर्शन करण्यात आले असून त्यामध्ये नवीन टायगन, टायरॉन आर-लाइन, नव्याने दाखल झालेली टायरॉन लाइफ आणि लोकप्रिय प्रीमियम सेडान व्हर्टसचा समावेश आहे. श्री. ऋतुराज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली 40 प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची टीम या डीलरशिपमधून ग्राहकांना विक्री व विक्रीनंतरच्या सेवा देणार आहे. याशिवाय चिकलठाणा एमआयडीसी येथे स्वतंत्र स्पेअर्स व सर्व्हिस सेंटरचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर बाजारपेठेत व्होक्सवॅगनच्या व्हर्टस मॉडेलला सर्वाधिक पसंती मिळत असून कंपनीच्या एकूण विक्रीपैकी सुमारे 65 टक्के वाटा या मॉडेलचा आहे. नव्या डीलरशिपच्या उद्घाटनानिमित्त कंपनीने एका दिवसात 10 वाहनांची मेगा डिलिव्हरी पूर्ण करत शहरातील आपली 3,643 वी कार ग्राहकांच्या ताब्यात दिली. तसेच उद्घाटनानिमित्त पहिल्या 50 ग्राहकांना एक वर्षाचे मोफत सर्व्हिस व्हॅल्यू पॅकेज देण्याची घोषणा करण्यात आली.

## रामराज्य ग्रुपच्या राज्यव्यापी वृक्षारोपण मोहिमेचा प्रारंभ; मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रामराज्य ग्रुपतर्फे राज्यभर १० हजार वृक्ष लागवडीचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या राज्यव्यापी वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पहिले वृक्ष लावून करण्यात आला.



यावेळी रामराज्य ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष रामाभाऊ मुळे, आयोजक सचिन राठोड, राजू राठोड, माऊली तोडमल, आदिनाथ मुळे, रणजीत राठोड, शुभम डमाळे पाटील, शुभम नेव्हळ, अमोल धनवटे, साहिल राठोड, अनिल औताडे, अविनाश दौंड, अभि राजपूत, विठ्ठल उबाळे, विशाल दांडगे, मयूर वैष्णव, ऋषी जाधव, शैलेश चव्हाण, सौरभ भोजने, विशाल सरोदे, अशोक औताडे यांच्यासह रामराज्य ग्रुपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मंत्री अतुल सावे यांनी रामराज्य ग्रुपच्या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक करत, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. राज्यभर टप्प्याटप्प्याने १० हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प रामराज्य ग्रुपने केला असून, पर्यावरण संरक्षणाबरोबरच जनजागृती करण्याचाही या मोहिमेचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## एसआयआर अभियानात शाफीयाबादच्या मतदान यादी भाग क्र. 161 चे काम शंभर टक्के पूर्ण

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.१५ जुलै ; भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) अभियानांतर्गत मौजे शाफीयाबाद येथील मतदान यादी भाग क्रमांक १६१ मधील काम शंभर टक्के पूर्ण केल्याबद्दल बूथस्तरीय अधिकारी (बीएलओ) संजय त्रिंबक मधुकर यांचा गौरव करून अभिनंदन करण्यात आले.

यावेळी सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी (एईआरओ)



दिलीपकुमार सोनवणे, मतदार नोंदणी स्वयंसेवक (व्हीआरओ) संजय विसपुते तसेच केंद्र अधिकारी (सीओ) अलका पटरे यांनी बीएलओ संजय मधुकर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षणाचे काम नियोजनबद्ध, अचूक आणि विहित मुदतीत पूर्ण केल्याबद्दल त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

एसआयआर अभियानात मतदारांची माहिती अद्ययावत करणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे आणि मतदार यादी अचूक करण्यासाठी बीएलओ संजय मधुकर यांनी केलेल्या परिश्रमांची दखल घेत उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच आगामी निवडणूक प्रक्रियेतही अशीच कार्यक्षमता कायम ठेवण्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

## छत्रपती शिवाजी विद्यालयात माता-पालक सभा उत्साहात

### आरोग्य, शिक्षणासह एचपीव्ही लसीकरणाबाबत मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

कन्नड - तालुक्यातील बनशेंद्रा येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालयात माता-पालक सभेचे उत्साहात आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींचे आरोग्य, शैक्षणिक प्रगती, एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व तसेच पालक-शाळा समन्वय या विविध विषयांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल एडके होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र, हतनूर येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी पडूळ, आरोग्य पर्यवेक्षिका रत्नमाला हातकर, आरोग्य सेविका प्रियंका मक्सरे तसेच विद्यालयाचे पर्यवेक्षक शिवाजी धायतडक उपस्थित होते.



सभेच्या प्रारंभी नुकतीच महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेल्या सुचित्रा लोंढे (महिला पोलीस, वर्धा) आणि सीमा गोरे (महिला पोलीस, नागपूर) यांच्या यशाबद्दल त्यांच्या मातांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या यशाचे कौतुक करत विद्यार्थिनींनीही अशाच प्रकारे विविध क्षेत्रांत यश संपादन करावे, असा विश्वास व्यक्त केला.

मुख्याध्यापक अनिल एडके यांनी विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत पालकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. त्यानंतर डॉ. अश्विनी पडूळ यांनी विद्यार्थिनींच्या आरोग्याच्या दृष्टीने एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व, त्याचे फायदे, संरक्षणात्मक भूमिका तसेच किशोरवयीन मुलींनी घ्यावयाची आरोग्याची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित माता-पालकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नमाला हातकर यांनी केले. यावेळी आरोग्य विभागाच्या कल्पना बोर्डे, दीपाली चोपडे, कांचन मोहिते, अश्विनी चोपडे, कमल जारवाल, रेखा बोर्डे, भाग्यश्री घाडगे, उषा मोतींगे, मंदाकिनी जगताप, सुरेखा वाडेकर, सविता जंजाळ, चंद्रकला मोतींगे, अर्चना मोतींगे, मनीषा घाडगे, सुनिता गोरे, सीमा देवरे, ज्योती वंजारे, मिनाबाई माने, सुनिता आगळे यांच्यासह विद्यालयाचे सुरेश वाघ, आतिश जगताप, विजय अहिरे, भरत पवार, प्रदीप भोकन, गणेश खिल्लारे तसेच गावातील माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## खरीप 2026 साठी क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनच्या सहा अत्याधुनिक कृषी नवकल्पना

**मुंबई :** खरीप हंगामातील बदलते हवामान, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव आणि उत्पादनवाढीची गरज लक्षात घेऊन क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेडने खरीप २०२६ साठी सहा अत्याधुनिक कृषी उत्पादने सादर केली आहेत. सोयाबीन, मका, भात आणि कापूस या प्रमुख पिकांसाठी विकसित करण्यात आलेली ही उत्पादने शेतकऱ्यांचे उत्पादन, गुणवत्ता आणि नफा वाढविण्यास मदत करतील, असा कंपनीचा दावा आहे. सोयाबीनसाठी पेटंट तंत्रज्ञानावर आधारित 'सामोरियन' आणि मक्यासाठी 'टाकुरो' ही तणनाशके सादर करण्यात आली असून ती गवत व रुंद पानांच्या तणांवर प्रभावी नियंत्रण ठेवतात. भात पिकासाठी 'झेबेरिया' आणि 'मॅक्सेंट्रा' ही बुरशीनाशके विकसित करण्यात आली असून ती बुरशीजन्य व जिवाणूजन्य रोगांवर नियंत्रण ठेवून पिकाची गुणवत्ता सुधारतात. कापसासाठी स्मार्ट ट्रिपल ॲक्शन तंत्रज्ञानावर आधारित 'वाल्टुवा' हे कीटकनाशक रसशोषक किडींवर प्रभावी संरक्षण देते. तसेच GreenAg तंत्रज्ञानावर आधारित 'KGR-T' हे सेंद्रिय पोषण उत्पादन फुले, फळधारणा आणि पिकाची वाढ सुधारण्यास उपयुक्त ठरणार आहे.

कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अंकुर अग्रवाल यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन परवडणारे आणि परिणामकारक उपाय विकसित करण्यावर कंपनीचा भर आहे. व्यापक क्षेत्रीय पडताळणीनंतर ही उत्पादने बाजारात आणण्यात आली असून शाश्वत शेती आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाद्वारे भारतीय शेतकऱ्यांना सक्षम करण्याची कंपनीची वचनबद्धता कायम राहणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले.

## नशामुक्ती अभियानांतर्गत चित्रकला तसेच घोषवाक्य लेखन स्पर्धा

**सोयगाव,दि.१५ जुलै :** नशामुक्त भारत अभियानाच्या जनजागृती उपक्रमांतर्गत जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे गटशिक्षणाधिकारी अक्षय धुदल तसेच केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी दि.१४ जुलै रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी "व्यसनमुक्त जीवन-निरोगी जीवन" तसेच व्यसनमुक्त गाव या विषयावर उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अत्यंत सुंदर,आकर्षक आणि संदेशपर चित्रे साकारली.विद्यार्थ्यांनी चित्रांमधून तंबाखू, गुटखा,मद्य व इतर व्यसनांचे दुष्परिणाम,निरोगी जीवनशैलीचे महत्त्व आणि व्यसनमुक्त समाजाची संकल्पना प्रभावीपणे मांडण्यात आली.त्यांच्या कल्पकतेने आणि सामाजिक जाणीवेने स्पर्धेला विशेष उंची मिळाली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी जागरूकता निर्माण झाली आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचविण्यास हातभार लागला.

### जाहिर प्रगटन

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-265

दिनांक 17-06-2026

अर्जदार ०:- नामदेव भिका गायकवाड रा. उंबरखेडा ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय उंबरखेडा (आदर्श वसाहत) ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या वडीलचे मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा वडील भिका म-या भिल चा मृत्यू दिनांक 18-04-1984 रोजी उंबरखेडा (आदर्श वसाहत) ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या वडील चा मृत्यू दिनांक 18-04-1984 रोजी उंबरखेडा (आदर्श वसाहत) ता. कन्नड । ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा वडील भिका म-या भिल यांचा मृत्यू दिनांक 18-04-1984 रोजी उंबरखेडा (आदर्श वसाहत) ता. कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 29-07-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 18-04-1984 रोजी उंबरखेडा (आदर्श वसाहत) ता. कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ....../06/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### जाहिर प्रगटन

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-263

दिनांक 06-07-2026

अर्जदार ०:- लिलाबाई आनंदा सोनवणे रा. उंबरखेडा ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय उंबरखेडा ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या नातचे मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा नात उखडर्या म-या भिल चा मृत्यू दिनांक 13-05-1985 रोजी उंबरखेडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या नात चा मृत्यू दिनांक 13-05-1985 रोजी उंबरखेडा ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा नात उखडर्या म-या भिल यांचा मृत्यू दिनांक 13-05-1985 रोजी उंबरखेडा ता. कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 05-08-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 13-05-1985 रोजी उंबरखेडा ता. कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक ....../07/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

जाक्र 2026/संकीर्ण/जमुअ/सीआर-874/कावि-03

दिनांक 13/7/2026

जाहीर प्रगटन

अर्जदार श्री / श्रीमती शेख समीर शेख मोहसिन रा. काजी मोहल्ला नितीन नगर कन्नड ता. कन्नड छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदारः उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैधकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम 1969 सुधारीत अधिनियम 2023 चे कलम 13 (3) अन्वये अर्ज

संदर्भः- श्री/श्रीमती. शेख समीर शेख मोहसिन, रा. काजी मोहल्ला नितीन नगर कन्नड ता. कन्नड छ. संभाजीनगर यांचा अर्ज दि. 22.06.2026

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम 1969 चे सुधारीत अधिनियम 2023 चे कलम 13 (3) अन्वये अर्जदार यांचे मुलगा नामे, शाहजेन समीर शेख यांचा दिनांक 26.06.2024 रोजी शासकीय वैधकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नोंद नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री/श्रीमती. शेख समीर शेख मोहसिन यांचे मुलगा नामे, शाहजेन समीर शेख यांची जन्म नोंद नसल्याबाबत उपनिबंधक, जन्ममृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर

उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैधकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे सिया मुलगा नामे, शाहजेन समीर शेख यांचा दिनांक 26.06.2024 रोजी शासकीय वैधकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन 30 दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप / हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप /हरकत/ तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / 2026 रोजी देण्यात आले.

दिनांकः//2026

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर,

उप विभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी,
छत्रपती संभाजीनगर करीता

### मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.

जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क. ९५/२०२६

अर्जदार:- १. विकास तुळशीराम बाविस्कर, वय ६५ वर्षे, धंदा निल, रा. शिवाजीनगर, आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. सौ. हार्षल देवकीनंदन सूर्यवंशी, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. राजमुद्रा फेडरेशन रोड, रेल्वे स्टेशन जळगांव जवळ शिवाजीनगर, जळगांव, ता. जि. जळगांव. 3. तिलेश्वरी दिवाकर झाल्टे, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. दुसरा मजला अ, विंग, गोकुळ रेसिडन्सी खडक पाडा कल्याण वेस्ट, ता. कल्याण, जि. ठाणे.

विरूध्द

गैरअर्जदारः निरंक

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

वारस सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर.ए. गिरी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत अरुणा भास्कर पाटील (माहेरचे नांव) उर्फ प्रितीछाया विकास बाविस्कर (लग्नानंतरचे नांव) हे दि. १७/०२/२०१२ रोजी आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ३ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत अरुणा भास्कर पाटील उर्फ प्रितीछाया विकास बाविस्कर यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख

आज दि. 3/8/2026 रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माधवबाग'मधील मधुमेहावरील आयुर्वेद उपचारांचे संशोधन आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : माधवबाग प्रकाश नगर क्लिनिक, लातूर येथे टाईप-२ मधुमेहाच्या रुग्णांवर राबविण्यात आलेल्या संरचित आयुर्वेदिक उपचार पद्धतीच्या परिणामांचा अभ्यास करणारा संशोधन लेख ' ग्लोबल जरनल ऑफ फार्मा इनोव्हेशन ' या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकात प्रकाशित झाला आहे.

या संशोधनात डॉ. रोहित साने, डॉ. गुरुदत्त अमीन, डॉ. प्रवीण घाडीगावकर, डॉ. बिपीन गोंड यांच्यासह डॉ. स्वप्नील देशमुख व डॉ. अबरार सगरे यांनी लेखक म्हणून योगदान दिले आहे. या अभ्यासात लातूर येथील माधवबाग क्लिनिकमध्ये उपचार घेतलेल्या टाईप-२ मधुमेहाच्या ४६ रुग्णांच्या उपचारानंतरच्या नोंदींचे शास्त्रीय विश्र्लेषण करण्यात आले आहे.

या संशोधनामध्ये बीएमआय - आधारित पंचकर्म उपचार, नियंत्रित कॅलरीयुक्त आहार आणि रुग्णानुसार वैयक्तिकृत आयुर्वेदिक औषधोपचार यांच्या एकत्रित परिणामांचे मूल्यांकन करण्यात आले. अभ्यासात उपचारानंतर *क्ल-१ल, रक्तातील साखरेचे प्रमाण (ठइड), वजन, इचख, पोटाचा घेर तसेच रक्तदाबामध्ये सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण सुधारणा आढळून आली. तसेच, उपचारानंतर अनेक रुग्णांमध्ये मधुमेहावरील औषधांच्या मात्रेत अंशतः किंवा पूर्ण घट झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. या संशोधन लेखाच्या प्रसिद्धीबद्दल लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. अमीन, डॉ. घाडीगावकर, डॉ. गोंड, डॉ. देशमुख, डॉ. सगरे यांचे अभिनंदन केले आहे.



## विविध वृत्त....

## शहरातील सर्व इमारतींचे तात्काळ फायर ऑडिट करा

### स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांचे निर्देश

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : उत्तर प्रदेशातील लखनऊ येथे एका इमारतीला लागलेल्या भीषण आगीत १५ निष्पाप विद्यार्थ्यांचा होरपळून मृत्यू झाला होता. या अत्यंत दुर्दैवी आणि धक्कादायक घटनेनंतर आता लातूर शहर महानगरपालिका प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे. स्थियी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी शहरातील सर्व खाजगी क्लासेस, महाविद्यालये, वसतिगृहे आणि व्यावसायिक इमारतींचे तात्काळ फायर ऑडिट करण्याचे कडक निर्देश अग्निशामक विभागाला दिले आहेत.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेवरून स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले यांनी तातडीची बैठक घेतली. लातूर ही शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. मात्र, लखनऊमधील दुर्घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्र्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. भविष्यात लातूरमध्ये अशी कोणतीही दुर्दैवी घटना घडू नये, यासाठी महानगरपालिका ॲक्शन मोडमध्ये आली आहे.

स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी अग्निशामक दलाची विशेष बैठक घेऊन संपूर्ण शहरातील इमारतींचा आढावा घेतला. केवळ शैक्षणिक संस्थाच नव्हे, तर व्यावसायिक आणि निवासी इमारतींमधील नागरिकांचे प्राणही तितकेच मोलाचे आहेत.

## उड्डाण पुलाजवळील लोखंडी कमान पुन्हा जमीनदोस्त



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी लातूर शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी अजब तोडगा काढला आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाणारे रस्तेच चक्क बंद करुन टाकले आहेत. अवजड वाहने चौकात जाऊ नयेत म्हणुन उड्डाण पुल सुरु होतो तिथे ९ फुट १० इंच उंचीची कमान तिसऱ्यांदा उभी केली होती. तीही अज्ञात वाहनाच्या धडकेत जमीनदोस्त झाली आहे.

लातूर शहरातील वाहतूकीची समस्या सोडविण्यासाठी पोलिसांनी अघोरी प्रयत्न करत छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणारा मार्ग भुयारी मार्गापासून बंद केला, त्यानंतर

वाहतूक बंद असलेला उल्लेख कु ठेही नसल्याने मोठी वाहने भुयारी मार्गपर्यंत जायची व तिथून त्या वाहनाना रिवर्स घेऊन यावे लागायचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक जाम होत होती. यावर उपाय म्हणून उड्डाण पुलाच्या सुरुवातीलाच लोखंडी कमान बसविण्यात आली. मात्र रात्रीच्या अंधारात मोठया वाहन धाराकांना ही कमान न दिसल्याने थेट कामानिवरच वाहन धडकून कमान तुटून खाली पडली. असा प्रकार एकदा नाही तर तीन वेळा घडला आहे.

## अवैध प्रवासी वाहतुकीच्या वाहनांची संख्या वाढली

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : शहरात ऑटोरिक्षा, दुचाकी, तीनचाकी, चारचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शहरातील रस्त्यांची रुंदी इतक्या वर्षांत कधीच वाढली नाही. वाढली ती वाहनांची संख्या. त्यामुळे सर्वच रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. त्यातच आता भर पडली ती अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या, अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने ही वाहने भर रस्त्यात उभी राहात असल्याने वाहतूक कोंडीत अधिकची भर पडत आहे.

## आरोग्य सेवांचा गुणात्मक दर्जा वाढवावा एकात्मिक आरोग्य वर्धिनी समिती आढावा बैठकीत आ. रमेशआप्पा कराड यांची सूचना




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : लातूर ग्रामीण मतदार संघात ९५% आयुष्यमान आरोग्य कार्डचे वितरण झाल्याबद्दल समाधान व्यक्त करून ग्रामीण भागातील जनतेला केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांच्या दर्जात गुणात्मक आणि परिणामकारक वाढ करावी, सुविधांचे बळकटीकरण व्हावे आणि आरोग्य विषयक उपक्रम लोकाभिमुख करावेत यासाठी अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यरत राहावे अशी सूचना लातूर ग्रामीण विधानसभेचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी केली आहे.

राज्य शासनाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या क्षेत्रासाठी आरोग्य विषयक नव्याने गठीत करण्यात आलेल्या एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची पहिली बैठक समिती अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली १५ जुलै बुधवार रोजी लातूर येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली.

या बैठकीस समिती सदस्य जि.प. महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पं.स. सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, लातूर पं.स. सभापती श्रीकांत बैले, जि.प. सदस्य महादेव साळुंके, सौ. आशाताई भिसे, सौ. छायाताई चिंचोलकर, सौ. राजश्री देशमुख, सौ. अश्र्विनी शिंदे, महादेव मस्के, सौ. सोनाली थोरमोटे, सौ. भागीरथी पाटील, सौ. दीप्ती आदमाने, जि.प. सां. बा. उप अभियंता सुभाष कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक सारडा, रेणापूर ग्रामीण रुग्णालय अधीक्षक सौ. ए. बी. अलगुले, बाभळगाव ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. एस. एस. बालकुंदे, मुरुड ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजाभाऊ गलांडे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, औसा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर, समिती सचिव लातूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आर. एच. पवार, सहसचिव रेणापूर तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी यांच्यासह संबंधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

लातूर ग्रामीण मतदार संघातील प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, इमारतीची अवस्था, आरोग्याच्या सुविधा, प्रयोगशाळा, अधिकारी, कर्मचारी, आरोग्य सेविका, मनुष्यबळ, आयुष्यमान आरोग्य कार्ड, कुटुंब कल्याण योजना, स्वच्छतागृह, पाणीपुरवठा, रिक्त पदे याबाबतचा सविस्तर आढावा समिती अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी घेतला. आरोग्य सेविकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत त्याचबरोबर जीर्ण झालेल्या आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरुस्ती आणि नव्याने इमारत बांधकाम यासाठी राज्याचे आरोग्य मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

जनतेचे आरोग्य सदृढ राहावे यासाठी आरोग्स सुविधा सक्षम असल्या पाहिजेत त्या साठी लागणाऱ्या भौतिक व सर्वप्रकारच्या सोयी सुविधा कमी पडू दिल्या जाणार नाहीत तेंव्हा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी समजून काम करावे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, अंगणवाडी, बालवाडी सह शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी बरोबरच वयोगट १४ ते १५ दरम्यानच्या मुलींना गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यासाठी जनजागृती करावी असे बोलून दाखवले.

या बैठकीत समिती सदस्यांनी विविध प्रश्र्न उपस्थित करून अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या तर रेणापूर, लातूर तालुका आणि भादा सर्कलसह लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रातील आरोग्य यंत्रणा, सोयीसुविधेची सविस्तर माहिती संबंधित तालुका आरोग्य अधिकारी यांनी दिली.

बैठकीचे सुत्रसंचलन आरोग्य सहा. प्रशांत शेटे यांनी केले.

या बैठकीस भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, शरद दरेकर, पांडुरंग बालवाड, भागवत सोट, अनिल भिसे, राजकिरण साठे, हनुमंत गव्हाणे यांच्यासह अनेक जण होते. प्रारंभी समिती अध्यक्ष आणि सदस्यांचा आरोग्य विभागाच्या वतीने यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले.

## इनरव्हील क्लब ऑफ लातूरचा पदग्रहण सोहळा उत्साहात



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : इनरव्हील क्लब ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्वयंसेवी संघटना असून सामाजिक जाणिवेतून ही संघटना कार्यरत आहे. यामध्ये लातूर जिल्हा सुद्धा समाविष्ठ आहे. इनरव्हील क्लब ऑफ लातूर ही या आंतरराष्ट्रीय संस्थेची एक शाखा आहे. या क्लबचा सन २०२६-२७चा पदग्रहण सोहळा भालचंद्र ब्लड बँकेमध्ये मोठ्या उत्साहात झाला.

कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्षा चंद्रकला भार्गव, माजी विभागीय अध्यक्षा निर्मला सोमाणी, लातूर महानगरपालिकेच्या नगरसेविका प्रेरणा होनराव, मावळत्या अध्यक्षा रेश्मा बोरा, नूतन अध्यक्षा शीला यादव, उपाध्यक्षा ज्योती वर्मा, कोषाध्यक्षा डॉ. प्रीती अग्रोया, संपादक डॉ. अश्र्विनी रोडे, उषा सचदेव, कार्यकारी सदस्या अनुराधा कडेल, ममता अग्रवाल, डॉ. स्वाती शेळके, संता लोया, अनुराधा बेळंबे, कुसुम अग्रवाल आदीची उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शक समिती गठीत करण्यात आली. माजी अध्यक्षा सुनीता अग्रोया, सुमित्रा गोरखे, मेघा अग्रोया आणि सारिका गांधी यांची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शीला यादव यांनी केले, तर सूत्रसंचालन मेघा अग्रोया, डॉ. अश्र्विनी रोडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार उत्कर्षा भालके यांनी मानले.

## महिलांसाठी मोफत शिलाई मशिन प्रशिक्षण केंद्राची सुरुवात



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने लातूरच्या विलासराव देशमुख फाउंडेशनकडून विविध उपक्रम राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून लातूर शहरातील वेगवेगळ्या भागात महिलांसाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र सुरु केले जात आहेत. लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील महालक्ष्मी मंदिर परिसर, राचट्टे गल्ली, गांधी चौक यासह परिसरातील महिलासाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १६ चा शुभारंभ सोहळा ट्वेन्टी वन ॲग्रो लि. च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख यांच्या हस्ते दि. १४ जुलै रोजी दुपारी महात्मा गांधी चौकातील महालक्ष्मी मंदिर हॉल येथे झाला.

विलासराव देशमुख फाउंडेशन लातूरच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कौशल्य विकास उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सुरू करण्यात येणाऱ्या मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्रात महिलांना आधुनिक पद्धतीने शिलाईचे प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी देखील मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. या बोलताना ट्वेन्टी वन ॲग्रो लि. च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख म्हणाल्या की, महिलांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठी या कौशल्याचा उपयोग करून त्यांच्यामध्ये आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी विलासराव देशमुख फाउंडेशन काम करत आहे हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत देण्यात येत आहे. आज पर्यंत विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून ७ हजारांपेक्षा अधिक महिलांना रोजगारभीमुख प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामध्ये शिलाई मशीन, ब्युटी पार्लर, इंग्लिश स्पोकन रिटेल सेल्स, केक तयार करणे अशा विविध कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्यात आले. याचा लातूर शहरातील व परिसरातील महिलांना उपयोग होत आहे.

त्याचबरोबर विलासराव देशमुख फाउंडेशन कडून व्ही. डी. एफ बाजार ही संकल्पना राबविण्यात येत आहे याच्या माध्यमातून शहरातील व शहरालगतच्या परिसरातील महिलांना एक हक्काची बाजारपेठ तयार करण्याचे काम विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून झाले आहे. या कार्यक्रमासाठी लातूर शहर महानगरपालिकेचे उपमहापौर ॲड. स्नेहल श्रीकांत उटगे, विलासराव देशमुख फाउंडेशन स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या विभाग प्रमुख श्रीमती संगीता मोळवणे, मनपा सदस्या श्रावणी बालाजी झिपरे, प्रज्ञा उटगे, रेहानाबेगम शेख, मनपा सदस्य अभिषेक पतंगे, यांच्यासह परिसरातील प्रशिक्षण घेणाऱ्या महिला, बचतगट सदस्य, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा सुनिल कच्छवे यांनी स्वीकारला पदभार




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लातूर विभागाच्या उपसंचालक (माहिती) पदाचा पदभार विभागीय माहिती कार्यालय, लातूर येथे सुनिल कच्छवे यांनी आज स्वीकारला.

पदभार स्वीकारुन त्यांनी विभागीय माहिती कार्यालय, आणि लातूर जिल्हा माहिती कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेतला. विभागाच्यावतीने सहायक संचालक (माहिती) डॉ. श्याम टरके यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी लातूरचे प्र.जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, सहायक अधीक्षक अशोक माळगे, वरिष्ठ लिपिक मनिषा कुरूलकर, कनिष्ठ लिपिक कैलास लांडगे, शिपाई अशोक बोर्डे, शेख कलीम आदी उपस्थित होते.

सामान्य प्रशासन विभागाने ०८ जुलै २०२६ रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील उपसंचालक (माहिती), गट अ (वरिष्ठ) पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने त्यांची सरळसेवेने नियुक्ती केली आहे.

## ९० टक्के अनुदानावर मिळणार ठिबक आणि तुषार सिंचन ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १५ जुलै : जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांच्या शाश्र्वत विकासासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना (प्रति थेंब अधिक पीक) सन २०२६-२०२७ अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर ठिबक व तुषार सिंचन योजनेची अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

या कल्याणकारी योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक तसेच बहुभूधारक अशा दोन्ही गटांतील पात्र शेतकऱ्यांना विविध उपयोजनांच्या माध्यमातून एकत्रितपणे एकूण ९० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. यामध्ये दोन हेक्टरपर्यंत शेतजमीन असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ५५ टक्के, मुख्यमंत्री शाश्र्वत कृषी सिंचन योजनेतून २५ टक्के पूरक अनुदान आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना किंवा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून उर्वरित १० टक्के पूरक अनुदान मिळून एकूण ९० टक्के अनुदान दिले जाईल. त्याचप्रमाणे दोन हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या बहुभूधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून ४५ टक्के, मुख्यमंत्री शाश्र्वत कृषी सिंचन योजनेतून ३० टक्के आणि संबंधित स्वावलंबी योजनांमधून १५ टक्के पूरक अनुदान मिळून एकूण ९० टक्के अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा प्रत्यक्ष शेतीत वापर केल्यामुळे पिकांच्या उत्पादनात आणि उत्पादकतेत मोठी वाढ होऊन शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होणार आहे.

## डॉ. अजय जाधव यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : लातूरच्या बहुचर्चित शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.अजय अनिरुद्ध जाधव यांची निवड झाल्याबद्द्ल त्यांचा नुकताच स्नेहीजनांच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला.

शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाने रिक्त झालेल्या संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.अजय जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल डॉ. जाधव यांचा डॉ. हंसराज बाहेती, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. बालाजी गोमसाळे , ईश्र्वर बाहेती, डॉ. विद्यासागर बाहेती, जयप्रकाश दगडे, राजा कासट , वसंतराव पाटील आदी स्नेहीजनांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला. या सत्कारास उत्तर देताना डॉ. अजय जाधव यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्यावर विश्र्वास दाखवून संस्थेच्या अध्यक्षपदावर काम करण्याची मोठी जबाबदारी आपल्यावर सोपविल्याबद्दल सर्वांप्रति आभार व्यक्त केले. आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी निश्र्चितच व्यवस्थितपणे पार पडण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न करू. दिवंगत अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून यापुढेही संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपण प्रयत्नशील राहू. सर्वांना सोबत घेऊन संस्थेच्या नावलौकिकात भर घालण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही नूतन अध्यक्ष डॉ. अजय जाधव यांनी सांगितले. या निवडीबद्दल विविध स्तरातून डॉ.अजय जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# मास्तरांच्या मल्टिटास्किंगचा मुद्दा...

एका छोट्या उद्योगपतीकडे कार चालविण्यासाठी एक चालक होता. त्याचे थोडेसेही रिकामे किंवा शांत बसणे त्या उद्योगपतींना आवडत नसे. गाडीतून उतरल्या-उतरल्या त्याला काही ना काही काम सांगितले जाई. कधी झेरॉक्स काढ, पाणी दे, कधी पाण्याचा पंप लावून ये तर कधी झाडपूस कर इत्यादी. अगदी मालकांना विड्याचे पान लावून देण्यापर्यंतची कामे हा चालक करायचा. अधूनमधून कारही चालवायचा. तेव्हा मल्टिटास्किंग स्टाफ अर्थात एमटीएस ही संकल्पना नव्हती. ती आता बऱ्यापैकी रुजू झाली आहे. आजकाल एमटीएस म्हणून सेवा देणारी व्यक्ती कितपत बहुविध प्रकारची कामे करते, हे सांगता येत नाही. आपल्याकडील शिक्षकांना एमटीएसमध्ये रूपांतरित करण्याचा विडा प्रशासकीय व्यवस्थेने उचललेला आहे हे मात्र नक्की सांगता येते! शिक्षकाला सर्वोच्च दर्जा देण्याची आणि 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु' वगैरे म्हणण्याची आपली जुनीच पद्धत. शिक्षक किंवा मास्तर म्हणजे विद्यार्थ्यांना शिकवणारी किंवा त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि जीवन घडविणारी व्यक्ती असाच आपला साऱ्यांचा समज. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणे, त्यांच्या जिज्ञासेला चालना देणे, अभ्यासात मागे असलेल्या मुलांकडे लक्ष देणे आणि उद्याची सक्षम पिढी घडविणे, हीच खरी शिक्षकांची कामे. मात्र, सध्याची परिस्थिती पाहिली तर शिक्षकांच्या हातातील खडू-पुस्तके हळूहळू गायब होत असून, त्यांची जागा सरकारी कामांच्या फायली आणि विविध प्रकारच्या माहितीच्या तक्त्यांनी घेतली आहे. शिक्षकांना विविध प्रकारची १५ अशैक्षणिक कामे सक्तीने करावी लागत आहेत. मुख्याध्यापकांवर तर १९४ प्रकारच्या कामांचा बोजा टाकण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसह शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू. प्रत्येक विद्यार्थ्याची आकलनक्षमता वेगळी असते. कुणाला गणित अवघड जाते, कुणाला भाषा समजत नाही, कुणाच्या मनात प्रश्न असतात; पण ते विचारण्याचे धाडस नसते. अशा प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचण्याचे काम शिक्षकाला करावे लागते. त्यासाठी वेळ हवा, मानसिक शांतता हवी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शिक्षकाला शिकविण्याचे स्वातंत्र्य हवे. घडतेय ते असे की, शिक्षकांचा बराच वेळ अध्यापनाऐवजी इतर कामांमध्ये खर्च होत आहे. विविध प्रकारची माहिती गोळा करणे, सर्वेक्षणे करणे, सरकारी योजनांची आकडेवारी भरणे, ऑनलाईन नोंदी अद्ययावत करणे, अहवाल तयार करणे आणि वरिष्ठ प्रशासकीय कार्यालयांना माहिती पाठविणे अशा असंख्य जबाबदाऱ्या शिक्षकांच्या खांद्यावर टाकण्यात आल्या आहेत. एक प्रकारे त्यांना 'एमटीएस' बनविण्याचा सारा खटाटोप दिसतो. निवडणूक असली की शिक्षकांची आठवण होते. जनगणना असली तरी शिक्षक हवेत. सरकारी सर्वेक्षण करायचे असेल तरी शिक्षकच पाहिजेत. एखाद्या योजनेची माहिती गोळा करायची असेल तरी शिक्षक. सरकारच्या प्रत्येक विभागासाठी सहज उपलब्ध होणारा कर्मचारी म्हणजे शिक्षक, अशीच मानसिकता प्रशासनात निर्माण झाली आहे. सरकारी यंत्रणेची इतर कामे करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी आणि विभाग असताना शिक्षकांनाच वारंवार अशा कामांसाठी का जुंपले जाते, असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. परंतु, आतापर्यंत या प्रश्नाचे उत्तर कुणीही दिले नाही हेही तेवढेच खरे. कारण असे सांगतात की, सरकार त्याला पगार देत असते. मग शासनाच्या इतर विभागांत काम करणाऱ्यांना कोण पगार देतं? डॉक्टरला रुग्णांवर उपचार करण्याऐवजी सरकारी कार्यालयात फायली तपासण्याचे काम दिले, अभियंत्याला बांधकामांची पाहणी करण्याऐवजी जनगणनेसाठी पाठविले किंवा पोलिसांना कायदा-सुव्यवस्था राखण्याऐवजी महसुली सर्वेक्षणात गुंतविले तर ते जसे चुकीचे ठरेल, तसेच शिक्षकांना अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविणेही चुकीचे आहे. याचा फटका शेवटी विद्यार्थ्यांना बसतो. शिक्षकांची अशैक्षणिक कामे वाढली की त्यांचा शाळा आणि वर्गातील वेळ कमी होतो. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. परिणामी शाळेत उपस्थित राहूनही अनेक विद्यार्थ्यांच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट होत नाहीत. पुढील वर्गात गेल्यानंतर अभ्यास आणखी कठीण होतो आणि अशा विद्यार्थ्यांचे भविष्यच बिघडते.

एका बाजूला सरकार शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याच्या घोषणा करते. शाळांची गुणवत्ता तपासली जाते. शिक्षकांच्या कामगिरीचे परीक्षण होते. निकाल कमी लागला तर शिक्षकांना जबाबदार धरले जाते. मग त्याच शिक्षकांना वर्षभरात प्रत्यक्ष शिकविण्यासाठी किती वेळ दिला जातो, याचा हिशेब कोण करणार? शिक्षकाला शिकविण्याऐवजी सरकारी माहिती गोळा करण्यात गुंतवायचे आणि नंतर शिक्षणाची गुणवत्ता घसरल्याबद्दल त्यालाच दोष द्यायचा, हे कसे? वर्गात जाण्यापूर्वी शिक्षकाला तयारी करावी लागते, उदाहरणे शोधावी लागतात. प्रश्नपत्रिका तयार कराव्या लागतात. उत्तरपत्रिका तपासाव्या लागतात. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण करताना पालकांशी संवादही साधावा लागतो. स्वतःचे ज्ञान अद्ययावत ठेवावे लागते. ही सर्व कामे शैक्षणिक प्रक्रियेचाच भाग आहेत. शिक्षकांचा वेळ अशैक्षणिक कामांत खर्च झाला तर या महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांसाठी वेळ उरणार कसा आणि असा मल्टिटास्किंग मास्तर पिढ्यांचे भविष्य घडवणार कसा?

शिक्षण क्षेत्रासमोरील आव्हाने आधीच कमी नाहीत. सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनेक शाळांमध्ये शिक्षकांची असंख्य पदे रिक्त आहेत. अशा परिस्थितीत उपलब्ध शिक्षकांनाही इतर कामांसाठी शाळेबाहेर पाठविले तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी कोण घेणार? शिक्षणाचा अधिकार कायदा असो किंवा न्यायालयांनी वेळोवेळी दिलेले निर्देश असोत, त्यामागील मूलभूत भूमिका स्पष्ट आहे. शिक्षकांचा अधिकाधिक वेळ अध्यापनासाठी उपलब्ध असला पाहिजे. मात्र, प्रत्यक्ष परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला दिसत नाही. आदेश निघतात, परिपत्रके जारी होतात; पण प्रशासकीय यंत्रणेची शिक्षकांकडे पाहण्याची मानसिकता बदलत नाही. कोणतेही तातडीचे काम आले की सर्वांत आधी शिक्षकांची यादी मागविली जाते. शिक्षण प्रक्रियेशी संबंधित कामे शिक्षकांना दिली गेली तर हरकत नाही. अपवादात्मक परिस्थितीत अन्य कामेही राष्ट्रहिताच्या दृष्टीने त्यांच्याकडे सोपविता येतील. मात्र, अपवादाचे रूपांतर नियमात होणे धोकादायक आहे. सरकारने यासाठी स्पष्ट धोरण आखण्याची गरज आहे. शिक्षकांना कोणती कामे देता येतील आणि कोणती देता येणार नाहीत, याची निश्चित यादी असली पाहिजे. प्रत्येक विभागाने आपल्या कामासाठी आवश्यक स्वतंत्र मनुष्यबळ उभारले पाहिजे. सरकारच्या अनेक विभागांमध्ये असंख्य कर्मचाऱ्यांना कामच नाही. ज्यांना काहीच काम नसेल आणि तरीही ज्यांना पोसायचे असेल, अशांचा विशेष संवर्ग तयार करून अशा कामांसाठी गुंतविला तर साऱ्यांचेच भले होईल. शिक्षकांनीही बदलत्या काळानुसार आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. अशैक्षणिक कामांना विरोध करताना अध्यापनाच्या गुणवत्तेबाबत त्यांनी अधिक सजग राहणे आवश्यक आहे. शिक्षकांना वर्गात राहू द्या, ही मागणी रास्तच; पण प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचण्याची जबाबदारीही तितक्याच प्रामाणिकपणे पार पाडली गेली पाहिजे. शैक्षणिक गुणवत्तेची चिंता सरकारला खरोखरच असेल तर एक साधी गोष्ट करण्याची गरज आहे. ती म्हणजे शिक्षकांना वर्गात शिकवू द्या. त्यांच्या हातातील फायली कमी करा आणि खडू पुन्हा त्यांच्या हातात द्या. शिक्षक वर्गात असेल तरच विद्यार्थी शिकेल आणि विद्यार्थी शिकला तरच समाज पुढे जाईल. अन्यथा शिक्षणाच्या गुणवत्तेवर चर्चा होत राहतील, समित्यांचे अहवाल येतील, पण मूलभूत प्रश्न तसाच राहील... तो म्हणजे-शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवायचे कधी? ■

## विशेष

# 'बेस्ट'ला नवी दिशा

**प्रा. सुखदेव बखळे**

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. लाखो नागरिकांचे दैनंदिन जीवन येथील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून आहे. लोकल रेल्वेनंतर सर्वाधिक महत्त्वाची सेवा म्हणजे बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट). गेल्या अनेक दशकांपासून या 'बेस्ट'ने मुंबईकरांना परवडणारी, विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक बससेवा पुरवली. मात्र वाढती लोकसंख्या, खाजगी वाहनांची वाढ, आर्थिक अडचणी, जुनाट पायाभूत सुविधा आणि बदलत्या शहरी गरजा यामुळे 'बेस्ट'समोर अनेक आव्हाने उभी राहिली. या पृष्ठभूमीवर राज्य सरकारने बेस्टच्या २२ बस आगारांच्या पुनर्विकासाचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. हा केवळ इमारतींचा पुनर्विकास नसून मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा व्यापक कायापालट करण्याचा प्रयत्न मानला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत या पुनर्विकासासाठी नागरिकांचे हित, कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि शहराचा दीर्घकालीन विकास हे तीन मूलभूत आधारस्तंभ निश्चित केले. सार्वजनिक वाहतूक ही नफ्याच्या निकषावर चालणारी सेवा नसून सामाजिक जबाबदारी आहे, ही बाब लक्षात घेऊन हा आराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्यामुळे या प्रकल्पाकडे केवळ रिअल इस्टेट विकास म्हणून न पाहता शहराच्या भविष्यातील गरजांशी जोडलेल्या परिवर्तनाच्या उपक्रमाच्या रूपात पाहणे आवश्यक आहे.

मुंबईतील सुमारे १३२ एकर क्षेत्रावर पसरलेल्या 'बेस्ट'च्या २२ बस आगारांचा सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर पुनर्विकास करण्याची योजना आहे. या प्रकल्पात आधुनिक बस आगारे, स्मार्ट ईव्ही चार्जिंग सुविधा, कर्मचाऱ्यांसाठी निवासी घरे, व्यावसायिक संकुले, किरकोळ विक्री केंद्रे, सार्वजनिक वाहनतळ, कला दालने आणि नागरिकांसाठी खुल्या जागांचा समावेश करण्यात येणार आहे. या माध्यमातून उपलब्ध जमिनीचा अधिक कार्यक्षम वापर करून उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे. 'बेस्ट'ची आर्थिक स्थिती गेल्या अनेक वर्षांपासून चिंतेचा विषय राहिली आहे. वाढता खर्च, मर्यादित महसूल आणि प्रवासी संख्येतील चढ-उतार यामुळे या उपक्रमावरील आर्थिक ताण वाढत गेला.



अशा परिस्थितीत बस आगारांमधील उपलब्ध जागेचा सुयोग्य वापर करून अतिरिक्त उत्पन्न निर्माण करणे ही काळाची गरज बनली. व्यावसायिक विकासातून मिळणारे उत्पन्न बससेवा अधिक सक्षम करण्यासाठी वापरता आले, तर 'बेस्ट'ची आर्थिक शाश्वतता मोठ्या प्रमाणात सुधारू शकते. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'बेस्ट'च्या जमिनींची मालकी कायम उपक्रमाकडेच राहणार आहे. पुनर्विकासासाठी जमीन विकली जाणार नसून सार्वजनिक-खाजगी भागीदारी आणि दीर्घकालीन भाडेपट्टा या पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करतानाच तिचा अधिक परिणामकारक वापर करण्याचा मार्ग खुला होतो.

मुंबईसारख्या शहरात जमिनीचे मूल्य अत्यंत मोठे असल्याने या धोरणाला विशेष महत्त्व प्राप्त होते. पुनर्विकासामध्ये कर्मचाऱ्यांच्या हितालाही प्राधान्य देण्यात आले आहे. अनेक कर्मचाऱ्यांच्या निवासाच्या समस्या, जुन्या वसाहती आणि अपुऱ्या सुविधा या दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. नव्या आराखड्यात कर्मचाऱ्यांसाठी आधुनिक घरे उभारण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे त्यांच्या राहणीमानात सुधारणा होण्यास मदत होईल. कर्मचारी समाधानी असतील, तर सेवेच्या गुणवत्तेवरही त्याचा सकारात्मक परिणाम होणार आहे. भविष्यातील वाहतुकीचा विचार करता इलेक्ट्रिक बस हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरणार आहे. त्यामुळे प्रत्येक प्रमुख बस आगारात 'स्मार्ट ईव्ही चार्जिंग' सुविधा उभारण्याचा निर्णय दूरदृष्टीचा मानला जात आहे. प्रदूषणमुक्त आणि ऊर्जा कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्यासाठी ही सुविधा अत्यावश्यक आहे.

मराठी चित्रपटांसाठी निवडक बस आगारांमध्ये ३०० ते ४०० आसनक्षमतेची चित्रपटगृहे उभारण्याचा प्रस्तावही लक्षवेधी आहे. मुंबई ही मराठी चित्रपटसृष्टीचे प्रमुख केंद्र असली, तरी मराठी चित्रपटांसाठी स्वतंत्र प्रदर्शनस्थळांची संख्या मर्यादित आहे. या उपक्रमामुळे मराठी चित्रपटांना नवे व्यासपीठ मिळू शकते. त्याचबरोबर नागरिकांना वाहतूक केंद्रांमध्येच मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध होतील. 'बेस्ट'च्या बस ताफ्यामध्ये सात हजार नवीन बसेसचा समावेश करण्याचा प्रस्तावही तितकाच महत्त्वाचा आहे. मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी दहिसर, मानखुर्द, मुलुंड आणि ऐरोली येथील जकात नाक्यांना वाहतूक केंद्रांच्या स्वरूपात विकसित करण्याचा प्रस्तावही महत्त्वाचा आहे.

सिंगापूर, पॅरिस, हाँगकाँग आणि लंडनसारख्या शहरांमध्ये बस आगारे ही केवळ बसेस उभी करण्याची ठिकाणे नसून बहुउद्देशीय शहरी केंद्रे आहेत. त्या धर्तीवर मुंबईतील बस आगारे विकसित करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक सुरक्षित, स्वच्छ, तंत्रज्ञानाधारित आणि सुविधायुक्त सेवा मिळू शकते. तथापि, या प्रकल्पासमोर काही आव्हानेही आहेत. सार्वजनिक-खाजगी भागीदारीमध्ये पारदर्शकता राखणे, करारांची प्रभावी अंमलबजावणी, प्रकल्प वेळेत पूर्ण करणे, खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि पुनर्विकासादरम्यान बससेवा सुरळीत सुरू ठेवणे ही मोठी जबाबदारी असेल. याशिवाय व्यावसायिक विकासाच्या नावाखाली सार्वजनिक हिताला दुय्यम स्थान मिळणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागेल. नागरिक, कर्मचारी संघटना आणि तज्ज्ञांचा सहभाग घेऊन निर्णय प्रक्रिया अधिक विश्वासार्ह बनवणे आवश्यक ठरेल. 'बेस्ट' ही मुंबईची ओळख आहे. त्यामुळे तिच्या पुनर्विकासाकडे केवळ बांधकाम प्रकल्प म्हणून न पाहता सार्वजनिक वाहतुकीच्या भविष्याशी संबंधित सुधारणा म्हणून पाहणे गरजेचे आहे. 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत २०४७' या संकल्पनांच्या दिशेने वाटचाल करताना मजबूत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हा विकासाचा अत्यावश्यक पाया आहे. 'बेस्ट'च्या बस आगारांचा प्रस्तावित पुनर्विकास यशस्वी होणे हा मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेचाच नाही, तर देशातील इतर महानगरांसाठीही एक आदर्श नमुना ठरू शकतो. त्यामुळे या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# जन्म-मृत्यू सुलभ, प्रमाणपत्र कठीण

पूर्वी अगदी सहजतेने जन्म व मृत्यूचे दाखले मिळत होते. पण, गेल्या काही वर्षांत त्यामध्ये कमालीचा बोगसपणा झाला. प्रत्येक जिल्हास्थानावर हजारोंच्या संख्येने बनावट दाखले तयार झाल्याचे समोर आले. त्याचे दुष्परिणाम जाणवयाला लागल्याने दाखले देण्याची प्रक्रिया अधिक काटेकोर करण्याची आणि बनावट दाखले रद्द करण्याची मागणी झाली. त्यात अनेकांचे दाखले रद्द झाले तर काहींवर फौजदारी कारवाई सुरू करण्यात आली. संपूर्ण देशातच ही समस्या असल्याने दाखले देण्याची ठोस कार्यप्रणाली तयार करण्याची गरज लक्षात आली. त्यानुसार केंद्र सरकारने नागरी नोंदणी प्रणाली (सीआरएस) १ ऑक्टोबर २०२३ पासून देशभरात अनिवार्य केली आहे. या प्रणालीवर जन्म व मृत्यूची डिजिटल नोंदणी करणे बंधनकारक आहे. या प्रणालीद्वारे तयार झालेले प्रमाणपत्रच आता ग्राह्य धरले जाते. केंद्र सरकारने सुद्धा महत्त्वाच्या कागदपत्रांसाठी जन्म व मृत्यू दाखले बंधनकारक केल्याने अनेकांसाठी हे प्रमाणपत्र आवश्यक झाले. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे धाव घेतली आहे. तेथे गेल्यावर त्यांना जन्म-मृत्यू सुलभ पण, प्रमाणपत्र कठीण यांचा अनुभव येत आहे. त्यांची ओरड सुरू झाली आहे. प्रमाणपत्र देण्याचे नवे नियम पूर्वानुभव लक्षात घेऊन अत्यंत कडक बनवले आहे. त्यात बदल करण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारलाच आहे. नव्या नियमानुसार जन्म व मृत्यूच्या एक महिन्याच्या आत अर्ज केला तर प्रमाणपत्र देण्याचा अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याला आहे. महिना उलटून गेल्यावर एक वर्षापर्यंत अर्ज केला तर संबंधित अधिकारी पोर्टलवर नोंदणी घेऊन आवश्यक पुराव्यासह सदर अर्ज मंजुरीसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठवितो. ते अर्ज आणि पुराव्यांची शहानिशा करतात आणि ओटीपीद्वारे डिजिटल स्वाक्षरी करून मंजुरी देतात. पुराव्यांवर काही संशय आला तर अर्ज परत पाठविला जातो. संपूर्ण जिल्ह्यासाठी हा एकमेव अधिकारी प्राधिकृत करण्यात आला आहे. देशभरात हीच पद्धत आहे. एकट्या अमरावती जिल्ह्याचा विचार करायचा झाल्यास आजच्या स्थितीत अडीच हजार दाखले मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. विशेष म्हणजे हा अधिकारी फक्त याच कामासाठी नाही. त्याच्या मूळ कामाच्या व्यतिरिक्त हे काम त्याला स्वतःलाच करायचे असल्याने तो कितपत न्याय देईल हा प्रश्नच आहे. जन्म आणि मृत्यूच्या एक वर्षानंतर प्रमाणपत्रासाठी अर्ज केला तर प्रकरण तहसीलदाराकडे जाते. दुसरे महत्त्वाचे म्हणजे महापालिकेला एका महिन्यात २ हजारापेक्षा जास्त प्रमाणपत्र देता येत नाही. हा नियम सरसकट सर्व महापालिकांसाठी आहे. त्यामुळे मोठीच अडचण झाली आहे. ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद यांच्यासाठी प्रमाणपत्र देण्याची मर्यादा मान्य होऊ शकते. कारण, तेथे मागणी टाकण्यात आलेल्या मर्यादेपेक्षाही कमी आहे. फक्त एखादी मोठी नगरपरिषद त्याला अपवाद असू शकते. महापालिका क्षेत्र खूप मोठे असते. येथे जन्माचे व मृत्यचे प्रमाण तुलनेने जास्त असल्याने प्रमाणपत्राची मागणी देखील जास्त असते. या सर्व प्रक्रियेत आणखी एक अडचण म्हणजे २०१६ पूर्वीच्या जन्म व मृत्यूच्या नोंदी पोर्टलवर झालेल्या नाहीत. तेव्हाचे दाखले द्यायचे असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थेला पहिले पोर्टलवर नोंद घ्यावी लागते आणि त्यांच्याकडे असलेला नोंदीचा पुरावा जोडून मंजुरीला पाठवावा लागतो. जेव्हापासून नव्या नियमानुसार काम होत आहे, तेव्हापासून प्रत्येक महापालिकेच्या जन्म व मृत्यू विभागासमोर लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहे. दाखले मिळण्यासाठी फार वेळ लागत असल्याने काहींचा तर संताप अनावर होत आहे.

सध्या जी काही स्थिती निर्माण झाली आहे, त्यावर तातडीने मार्ग काढावा म्हणून महापालिकेचे पदाधिकारी राज्य सरकारकडे पाठपुरावा करीत आहेत. पण, राज्य सरकारचे सुद्धा हात बांधले आहे. नियमांमध्ये बदल करण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारलाच आहे. त्यांच्या पुढे हा विषय मांडायचा म्हणजे मुख्यमंत्र्यांमार्फतच तो केंद्रीय गृहमंत्र्यांसमोर मांडला जाऊ शकतो. मुख्यमंत्र्यांनी ही अडचण त्यांच्या लक्षात आणून द्यावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्राधिकृत अधिकाऱ्यांची संख्या वाढविणे आणि महापालिकास्तरावर दाखले देण्याच्या संख्येत वाढ करणे, या दोनच प्रमुख मागण्यात आहेत. एका चांगल्या उद्देशाने जन्म व मृत्यू प्रमाणपत्रासाठीचे नवे नियम लावण्यात आले आहेत. फक्त त्यांची कार्यप्रणाली सुलभ व्हावी, हीच अपेक्षा आहे. ■

९४२०७२१२२५

## धर्म संस्कृती

# दुर्गतिनाशिनी नवदुर्गा

**प्रा. दिलीप जोशी**

भारतीय उपासकांमध्ये शैव, वैष्णव, गाणपत्य असे विविध प्रकार आहेत. त्यातच आसेतुहिमाचल असणारा संप्रदाय म्हणजे शाक्त; जे शक्तीची म्हणजे देवीची उपासना करतात. वेदात शक्तीला 'श्री' म्हणतात. या 'श्री'ची तीन रूपे, दशरूपे अशी विविध रूपे आहेत. पण प्रामुख्याने देशभरात नवरूपांची उपासना केली जाते. त्या रूपांना नवदुर्गा म्हणून संबोधिले जाते. मार्कण्डेय पुराणात प्रसिद्ध अशी दुर्गा सप्तशती दिली आहे. या सप्तशतीचाच भाग कवच, किलक आणि अर्गला स्तोत्र आहे. यातील कवच स्तोत्रात नवदुर्गांचा उल्लेख पुढील श्लोकातून आहे.

प्रथमं शैलपुत्री च द्वितीयं ब्रह्मचारिणी।
तृतीयं चन्द्रघण्टेति कूष्माण्डेति चतुर्थकम्।।
पंचमं स्कन्दमातेति षष्ठं कात्यायनीति च।
सप्तमं कालरात्रीति महागौरीति चाष्टमम्।।
नवमं सिद्धिदात्री च नवदुर्गाः प्रकीर्तिताः।

यामध्ये १) शैलपुत्री २) ब्रह्मचारिणी ३) चंद्रघंटा ४) कूष्मांडा ५) स्कंदमाता ६) कात्यायनी ७) कालरात्री ८) महागौरी ९) सिद्धिदात्री ही दुर्गेची नवरूपे आहेत. या नवदुर्गांचा आज विचार करू.

**१) शैलपुत्री :** देवी भगवतीचे हे प्रथम स्वरूप असून केनोपनिषदानुसार हीच परब्रह्मपरमात्म्याची आद्याशक्ती असून तिचे नाव हैमवती आहे. शैल म्हणजे पर्वत आणि पुत्री म्हणजे कन्या. पर्वतराज हिमालय आणि मैनादेवी यांची ही कन्या म्हणून ती शैलपुत्री हिमवती.

वन्दे वांच्छितलाभाय चन्द्रार्धकृतशेखराम्।
वृषारूढां शूलधरां शैलपुत्रीं यशस्विनीम्॥

जिच्या उजव्या हातात त्रिशूळ आणि डाव्या हातात पद्म म्हणजे कमळ आहे. जी वृषभारुढा म्हणजे बैलावर बसलेली आहे. देवी सतीचा हा पुनर्जन्म आहे. योगशास्त्रानुसार आई शैलपुत्री ही मूलाधार चक्रावर स्थित आहे. तेथून चेतनेची सर्वोच्च पातळी गाठण्याची प्रेरणा ती देते म्हणून ती हैमवती. परमोच्च पातळीवर गेल्यावरच चैतन्याची अनुभूती येते.

**२) ब्रह्मचारिणी :** नवदुर्गारूपातील द्वितीयं ब्रह्मचारिणी म्हणजे दुर्गेचे दुसरे रूप ब्रह्मचारिणी रूप आहे. हे दुर्गेचे योगिनी रूप आहे.

दधाना करपदमाभ्यामक्षमालाकमंडलू।
देवी प्रसिदतु मयि ब्रम्हाचारिण्यनुमत्तमा।।

श्वेतवस्त्र, उजव्या हातात जपमाळ आणि डाव्या हातात कमंडलू आहे म्हणून ती ब्रह्मचारिणी आहे. ती शैलपुत्री म्हणजे हिमालय कन्या आहे. तिने देवर्षी नारदांच्या सूचनेवरून भगवान शिवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तप केले.

**३) चंद्रघंटा :** नवदुर्गेतील एक रूप चंद्रघंटा आहे.

पिण्डजप्रवरारूढ़ा ण्डकोपास्त्रकेर्युता।
प्रसादं तनुते मह्यं चंद्रघण्टेति विश्रुता॥

तिच्या मस्तकावर घंटेच्या आकाराचा चंद्र असतो. ती दशप्रहरणधारिणी असून त्रिशूल, गदा, भाला, धनुष्य, बाण, तलवार, रुद्राक्षमाला, कमंडलू, कलश आणि अभयमुद्रेत असणारी चंद्रघंटा म्हणजेच महिषासुरमर्दिनी आहे. महिषासुर मातला तेव्हा देवांच्या क्रोध आणि उर्जेतून ही शक्ती निर्माण झाली.

**४) कूष्मांडा :** भगवतीचे चौथे रूप कूष्मांड रूप आहे. कु म्हणजे लघु, उष्म म्हणजे ऊर्जा, उष्णता आणि अंड म्हणजे बीज म्हणून तिचे नाव कूष्मांड आहे.

सुरासम्पूर्णकलशं रूधिराप्लुतमेंव च।
दधाना हस्तपदमाभ्यां कुष्माण्डा शुभदास्तु में।।

ती अष्टभुजा असून तिच्या आठ हातात कमंडलू, धनुष्य, बाण, कमळ, अमृतकलश, चक्र, गदा आणि जपमाळ आहे. ती सिंहावर बसली आहे. ती अनाहत चक्रात स्थित आहे. जगनिर्माती म्हणून ती जगतजननी आहे.(कूष्मांड म्हणजे कोहळा भोपळा)

**५) स्कंदमाता :** स्कंद हे शिवपुत्र कार्तिकेय यांचे नाव आहे. त्यामुळे स्कंदमाता म्हणजे कार्तिकस्वामींची माता.

सिंहासनगता नित्यं पद्माश्रितकरद्वया।
शुभदास्तु सदा देवी स्कंदमाता यशस्विनी!!

तिचे वाहन सिंह आहे. भगवती स्कंदमातेला चार हात असून दोन हातात कमळ आहेत. तिच्या मांडीवर बाळ कार्तिकेय आहेत. तिसऱ्या हाताने तिने बाळाला धरले आहे तर चौथा हात अभयमुद्रेत आहे.

**६) कात्यायनी :** आदिमाया कात्यायनी भगवती दुर्गेचे सहावे रूप.

कंचनाभा वराभयं पद्मधरां मुकटोज्जवलां।
स्मेरमुखीं शिवपत्नी कात्यायनी नमोस्तुते॥

कात्यायनी माता सिंहावर विराजमान आहे. तिला चार हात असून दोन हातात तलवार आणि कमळ तर दुसरे दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रेत आहेत.

**७) कालरात्री :** आदिशक्तीचे कालरात्री हे विक्राळ स्वरूप आहे.

एकवेणी जपाकर्णपूरा नग्ना खरास्थिता,
लम्बोष्टी कर्णिकाकर्णी तैलाभ्यक्तशरीरिणी।
वामपादोल्ल सल्लोहलता कण्टक भूषणा,
वर्धनमूर्धध्वजा कृष्णा कालरात्रिर्भयङ्करी॥

रंग काळा, केश मोकळे, एका हातात खड्ग तर दुसऱ्या हातात काटेरी शस्त्र, दुसरे दोन हात अभय आणि वरद मुद्रेत. काळरात्री मातेचे वाहन गर्दभ म्हणजे गाढव आहे.

**८) महागौरी :** आदिशक्तीचे आठवे रूप महागौरी होय. महा म्हणजे सर्वाधिक आणि गौरी म्हणजे गौर वर्णाची.

श्वेते वृषेसमारूढा श्वेताम्बरधरा शुचिः ।
महागौरी शुभं दद्यान्महादेव प्रमोददा ॥

आत्यंतिक तेजस्वी गौरवर्णाची महागौरी श्वेत वस्त्र घालून श्वेत वृषभवाहिनी आहे. जिच्या दोन हातात त्रिशूळ आणि डमरू आहेत. दुसरे दोन हात अभय आणि वरदमुद्रेत आहेत.

**९) सिद्धिदात्री :** भगवती आदिमाया दुर्गेचे एक रूप सिद्धिदात्री आहे. सिद्धी म्हणजे अलौकिक शक्ती आणि दात्री म्हणजे देणारी. भगवान शिवाला या आद्याशक्तीने अष्टसिद्धी दिल्या म्हणून तिचे नाव सिद्धिदात्री पडले.

वन्दे वांछित मनोरथार्थ चन्द्रार्घकृत शेखराम्।
कमलस्थितां चतुर्भुजा सिद्धीदात्री यशस्वनीम्॥

कमळावर विराजमान सिद्धिदात्री चतुर्भुज आहे. तिच्या हातात शंख पद्म गदा आणि पद्म आहे. नवरात्रात नऊ दिवसही नवदुर्गेची नऊ रूपे मोठ्या भक्तीने पूजली जातात. आराधना केली जाते. त्रिगुणात्मिका जगदंबेच्या केवळ स्मरणाने ऐहिक आणि पारलौकिक सुखे प्राप्त होतात.

जो चार अक्षरे जपेन । जगदंब जगदंब ऐसे म्हणेन ।
त्याची दुष्टाक्षरे पुसेन । ललाटा वरची ।। ■

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### आषाढी एकादशी व पंढरीची वारी

आषाढी एकादशी म्हटली तर डोळ्यासमोर येते ती पंढरीची वारी. आषाढातल्या यव एकादशीच्या व्रतामध्ये सर्व देवतांचे तेज सामावलेले असते. वारकरी पायी वारी करतात. शेकडो किलोमीटरचा प्रवास आनंदाने करतात. गेल्या ८०० वर्षापासून हा पायी वारीचा महिमा सुरू आहे. भारतीय संस्कृतीत सन्मार्गाने वागावे, सत्याचरण करावे ह्यासाठी आपल्या संस्कृतीत विविध व्रतवैकल्य सांगितले आहे. मनावर जर अंकुश ठेवायचा असेल तर एकादशीचे व्रत फलदायी ठरते. उपवास व हरिस्मरण हा एकादशी व्रताचा मुख्य गाभा आहे. आहारशास्त्रानुसार बघितले तर लंघन करणे हे आरोग्यासाठी उत्तम असते. त्याचप्रमाणे मन हरिस्मरणाने सामर्थ्यवान व पवित्र बनते. एकादशीचे व्रत करतांना दशमीस एकभुक्त म्हणजेच एकवेळेस जेवण करावे व एकादशीस पूर्ण उपवास करावा व द्वादशीला विठ्ठलाला महानैवेद्य दाखवून उपवास सोडावा. श्रीविठ्ठलाबद्दल निरपेक्ष प्रेमभाव हे बळ प्रदान करणारे ठरते. आषाढी एकादशीला लाखो लोक, वारकरी विठोबाच्या दर्शनासाठी आसुसलेले असतात आणि एकदा विठ्ठल दिसला की सगळ्यांच्या मनात, हृदयात प्रेमभाव दाटून येतो. डोळ्यांना अश्रुधारा लागतात. विठुमिलनाचा तो सोहळा अनुपम, डोळ्याचे पारणे फेडणारा असतो.

**अलका माईणकर**/९४०३११४६५८

■■■

### पुण्याचे मनपाचे नाट्यगृह आणि अस्वच्छता

मागच्या आठवड्यात कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात जाण्याचा प्रसंग आला. तेथील व्यवस्था पाहून वीट आला. नाटककारांनी व्यथा मांडल्या आहेतच पण प्रेक्षकांचे काय? त्याकडे कोण पाहणार. सर्वत्र सफाईची वानवा जाणवते. सभागृहात तर कार्यक्रमापूर्वी स्वच्छता नसतेच. बाहेरही अस्वच्छता होती. खुर्च्यांची सफाई केलेली नव्हती. स्वछतागृह हे जणू स्वच्छ ठेवायचे असतात ह्याचा विसर पडलेला. बाजूच्या वऱ्हांड्यात नको असणारे सामान ठेवलेले होते. ह्या सर्व गोष्टी दर्शनी आहेत, जर बारकाईने पाहणी केली तर अजून भयानक अवस्था असू शकेल. आवाजाची प्रत खराब होती का ह्याचा शोध घ्यावा लागेल. या गोष्टी कलाकार, इतर संस्था सांगू शकतील. सभागृहामधून पार्किंगकडे वाट नाही. मनपा हे वापरण्यासाठी भाडे घेते. प्रेक्षक तिकिटे काढून येतो. त्याला योग्य सुविधा मिळावयास नको का? ती तशी देणे मनपास बंधनकारक नाही का? मनपा अधिकारी, पदाधिकारी यात लक्ष घालणार का?

**प्रदीप महाबळे**/पुणे

■■■

### जगन्नाथ पुरी रथयात्रा : भक्ती, श्रद्धा आणि अनोखी परंपरा

ओडिशामधील पुरी हे हिंदू धर्मातील चार प्रमुख धामांपैकी एक अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र आहे. येथील ८०० वर्षांहून अधिक जुन्या भव्य मंदिरात भगवान विष्णूंचा अवतार मानले जाणारे भगवान जगन्नाथ, त्यांचे बंधू बलभद्र आणि बहीण सुभद्रा यांच्यासह विराजमान आहेत. जरी या मंदिरात केवळ हिंदूंनाच प्रवेश दिला जात असला, तरी येथील वार्षिक 'रथयात्रा' मात्र संपूर्ण जगाला सामावून घेणारा एक मोठा सोहळा ठरतो. जगभरातून लाखो भाविक आणि अनेक विदेशी पर्यटकही ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत असतात, तो म्हणजे जगन्नाथ पुरीची विश्वप्रसिद्ध रथयात्रा. यावर्षी ही रथयात्रा १६ जुलै रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न होत आहे. या रथयात्रेमागे एक अतिशय हृदयस्पर्शी कथा आहे. ज्येष्ठ पौर्णिमेला भगवान जगन्नाथांना मोठ्या उत्साहात 'स्नान यात्रा' घडवून आणली जाते. या अतिस्नानामुळे देव आजारी पडतात, अशी भक्तांची श्रद्धा आहे. त्यानंतरच्या १५ दिवसांच्या 'अनसर' काळात देव विश्रांती घेतात आणि भक्तांना दर्शन देत नाहीत. प्रकृती सुधारल्यानंतर, आषाढ शुद्ध द्वितीयेला देव आपली मावशी, 'गुंडीचा' देवी यांच्या दर्शनाला जाण्यासाठी बाहेर पडतात. तेथे ते सात दिवस राहतात आणि भक्तांच्या प्रेमाचा स्वीकार करतात. या प्रवासाचाच भाग म्हणजे ही भव्य रथयात्रा होय.



या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे तीन अवाढव्य लाकडी रथ. 'नंदीघोष' भगवान जगन्नाथांचा रथ. 'तालध्वज' बलभद्रांचा रथ. 'दर्पदलन' सुभद्रेचा रथ. ही यात्रा केवळ एक धार्मिक सोहळा नसून, ती मानवी एकतेचे आणि समतेचे प्रतीक आहे. येथे कोणताही भेदभाव न करता, सर्व भक्त भगवंताच्या रथाला हात लावू शकतात. भगवान जगन्नाथांच्या डोळ्यांत पाहताना मिळणारी शांतता आणि रथाच्या दोरीला हात लावताना उचंबळून येणारा भक्तीचा पूर, हे शब्दांत मांडणे कठीण आहे. हा उत्सव म्हणजे मानवी मनाचे भगवंताशी जुळलेले एक अतूट नाते आहे. या रथयात्रेत सहभागी होणे, म्हणजे साक्षात आनंदाच्या आणि चैतन्याच्या प्रवासाचा अनुभव घेणे होय. ■

**वर्षा आवदे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## मारहाणीच्या गुन्ह्याचे खुनात रूपांतर; विट मारुन गंभीर जखमी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरातील चनई येथील वडारवस्ती परिसरात किरकोळ वादातून झालेल्या मारहाणीच्या घटनेत गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. या घटनेनंतर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 103 (1) (खून) ची वाढ करण्यात आली असून, चार जणांविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चनई वडारवस्ती, किरमाणी दर्गाच्या पाठीमागे राहणाऱ्या राणी बालाजी राठोड (वय 31) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, 10 जुलै 2026 रोजी दुपारी त्या शेळ्या चारण्यासाठी खदाणीजवळ गेल्या असताना परिसरातील महिलांमध्ये सुरू असलेल्या वादानंतर सुभाष लष्करे यांनी त्यांच्या अंगावर धाव घेत त्यांना ढकलून चापट मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यावेळी वाद सोडविण्यास आलेल्या त्यांच्या नातेवाईकालाही मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे

या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी, 11 जुलै रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास राणी राठोड यांच्या आई यशोदा बालाजी राठोड यांनी सुभाष लष्करे यांना मुलीला विनाकारण मारहाण का केली, असा जाब विचारला. त्यावरून दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला. फिर्यादीनुसार, यावेळी सुभाष लष्करे, त्यांची पत्नी मंदाकिनी, तसेच मुलगे विश्व आणि इंद्र यांनी शिवीगाळ व मारहाण केली.

वाद सुरू असताना सुभाष लष्करे यांनी प्रथम एक विट फेकून फिर्यादीच्या मामाला मारल्याचा, त्यानंतर दुसरी विट यशोदा राठोड यांच्या डोक्यावर जीवे मारण्याच्या उद्देशाने फेकल्याचा आरोप आहे. विट डोक्यात लागल्याने त्या जागीच कोसळल्या. त्यानंतर भांडण सोडविण्यास आलेल्या रोहन माणिक आडे यांनाही काठीने मारहाण करण्यात आल्याचा तसेच फिर्यादी राणी राठोड यांनाही मारहाण करून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. जखमी यशोदा राठोड यांना तातडीने शासकीय रुग्णालय,अंबाजोगाई येथे दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान आज (15 जुलै) सकाळी सुमारे 6.30 वाजता त्यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयातून प्राप्त झालेल्या वैद्यकीय अहवालानुसार डोक्यावर बोथट वस्तूचा मार लागल्यामुळे मृत्यू झाल्याचे प्राथमिक अभिप्रायात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात यापूर्वी दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक 292/2026 मध्ये भारतीय न्याय संहिता कलम 103 (1) (खून) ची वाढ करण्यात आली असून, न्यायालयात अहवाल सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकरणात सुभाष लष्करे, मंदाकिनी सुभाष लष्करे, विश्व सुभाष लष्करे आणि इंद्र सुभाष लष्करे (सर्व रा. वडारवस्ती, चनई, ता. अंबाजोगाई, जि. बीड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अंबाजोगाईसाठी 71 घरकुलांना मंजुरी

### नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश




**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरात सर्वसामान्य व गरजू नागरिकांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्यासाठी केंद्र शासनाच्या 'पंतप्रधान आवास योजना २.०' (PMAY 2.0) अंतर्गत नव्याने ७१ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. नवी दिल्ली येथे पार पडलेल्या केंद्रीय मंजुरी आणि संनियंत्रण समितीच्या (CSMC) बैठकीत या प्रकल्पाला अधिकृत मान्यता देण्यात आली. या महत्त्वपूर्ण कामासाठी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी शासनाकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आमदार नमिता अक्षय मुंदडा यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याने शहराच्य विकासात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. यासोबतच आणखी ६६ गरजू कुटुंबांसाठी

नवीन घरकुलांचा प्रस्ताव शासनाकडे दाखल केला असल्याचे नंदकिशोर मुंदडा यांनी सांगितले आहे.

या महत्त्वपूर्ण गृहनिर्माण प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत ४६१.५० लाख रुपये इतकी निश्चित करण्यात आली आहे. यात केंद्र सरकारचा वाटा १०६.५० लाख रुपये तर राज्य सरकारचा वाटा ७१.०० लाख रुपये असणार आहे. उर्वरित २८४.०० लाख रुपये हा प्रत्यक्ष लाभार्थ्यांचा हिस्सा असेल. प्रशासकीय मान्यतेनंतर अंबाजोगाई नगरपालिकेकडून हा प्रकल्प राबवला जाणार असून, यामुळे शहरातील पात्र आणि गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. या नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, मंत्री पंकजाताई मुंडे, आमदार नमिता मुंदडा यांचे आभार मानले आहेत. शहर विकासाच्या दृष्टिकोनातून आमदार नमिता मुंदडा आणि नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा हे सातत्याने कार्यरत आहेत. यापूर्वी नगरपालिकेत प्रशासक राजवट असताना देखील आमदार नमिता मुंदडा यांच्या विशेष प्रयत्नांतून शहरासाठी तब्बल १०२ घरकुले मंजूर करण्यात आली होती. आता या ७१ घरकुलांच्या अंतिम मंजुरीवरच न थांबता शहर विकासासाठी नगरपालिका प्रशासन अधिक गती काम करत आहे. शहरातील आणखी ६६ गरजू कुटुंबांसाठी नवीन घरकुलांचा प्रस्ताव शासनाकडे दाखल करण्यात आला असल्याची महत्त्वपूर्ण माहिती नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी दिली आहे. या प्रलंबित प्रस्तावाच्या मंजुरीसाठी सध्या जोरदार प्रयत्न सुरू असून, त्यालाही अत्यंत अल्पावधीतच मंजुरी मिळेल असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या या सक्रिय व तळागाळातील नागरिकांसाठी असलेल्या भूमिकेमुळे अंबाजोगाईच्या सर्वसामान्य जनतेमधून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.

## खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे भव्य प्रवेश सोहळा संपन्न!

**बीड, प्रतिनिधी :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील उबाठा गटातील अनेक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत काल दि. 13 जुलै रोजी रात्रीच्या सुमारास मुंबई येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्यात डॉ. श्रीकांतजी शिंदे यांनी सर्व नवप्रवेशितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत त्यांच्या भावी राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गेवराईत ना.पंकजाताई मुंडे यांनी केला विविध विकासकामांचा शुभारंभ, अतिक्रमन धारकांना केले पीटीआरचे वाटप

### स्वच्छ, सुंदर आणि प्रगत गेवराई अशी ओळख शहराला मिळवून देणार; 'वीज बिल मुक्त नगरपरिषद' उपक्रम राबविण्याची केली सूचना

**गेवराई. दि. १५ जुलै----** : गेवराई नगरपरिषद अनेक लोकोपयोगी आणि चांगले उपक्रम राबवित आहे. शहर स्वच्छ करण्यासाठी महिला बचत गटांच्या साहाय्याने सुरु असलेला उपक्रम अत्यंत चांगला, कौतुकास्पद आणि पर्यावरणपूरक आहे. लोकसहभागातून असे अनेक उपक्रम राबवून आपण शहराला स्वच्छ, सुंदर आणि प्रगत शहर अशी ओळख मिळवून देऊ. याकामी नागरिकांनी योगदान देऊन शहर विकासात योगदान द्यावे असे आवाहन करत 'वीज बिल मुक्त नगरपरिषद' अशी सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केली.



गेवराई येथे नगरपरिषदे अंतर्गत होत असलेल्या विविध विकास कामांचा शुभारंभ आज ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाला.याप्रसंगी गेवराई शहरातील नागरिकांना पीटीआरचे वाटप देखील त्यांच्या हस्ते करण्यात आले. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, नगराध्यक्षा गीताभाभी पवार, बाळराजे पवार, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, युद्धाजित पंडित यांच्यासह सर्व नगरसेवक यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी नागरिकांशी संवाद साधताना ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या की मी पालकमंत्री असताना गेवराई नगरपरिषदेला आणि मतदारसंघाला भरभरून निधी दिला. नगर परिषदेची इमारत, पाणीपुरवठा योजना, रस्ते, पायाभूत सुविधांसारखी विकास कामे आम्ही इथे केली. ग्रामीण भागात देखील अनेक कामे करता आली. महिला आणि बालविकास मंत्री असताना बचत गटांची चळवळ उभी केली,आज बचत गटांच्या महिलांचे शहर स्वच्छतेसाठी योगदान बघून आनंद वाटतो आहे.

घनकचरा प्रक्रियेच्या माध्यमातून नगरपरिषदेसाठी स्थायी उत्पन्न निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. येथील रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न देखील सोडवणार असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांना सांगितले. गेवराई शहरातील नागरिकांना विश्वास देताना ना. पंकजाताई म्हणाल्या गेवराईकरांच्या समस्या सोडविण्याची जवाबदारी माझी आहे, तुमच्या समस्या मार्गी लावताना दिलेल्या प्रत्येक आश्वासनाची पूर्तता करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विकास कामांचा घेतला आढावा

तत्पूर्वी ना. पंकजाताई मुंडे यांनी नगर परिषदेची आढावा बैठक घेतली, शहरातील विकास कामे, योजना यांचा त्यांनी आढावा घेतला. शहराच्या विकासासाठी शॉर्ट टर्म, मिडल टर्म आणि लॉन्ग टर्म' अशा पद्धतीने नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

## अन्यायकारक ढोल वसूली विरुद्ध क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पाऊण तास चक्का जाम आंदोलन

**केज /प्रतिनिधी :** केज - मांजरसुंभा महामार्गावरील उमरी टोल नाक्यावर स्थानिक चारचाकी वाहनांना टोलमुक्ती देण्याच्या प्रमुख मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या नेतृत्वाखाली दि.१४ जुलै वार मंगळवारी सकाळी ११:३० वाजता स्थानिक वाहनधारकांना व शेतकऱ्यांना घेऊन उमरी टोलनाका येथे चक्का पाऊन तास चक्का जाम आंदोलन करण्यात आले. यावेळी HPM टोल कंपनीच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी करुन टोल नाक्याच्या 20 कि.मी. क्षेत्रातील स्थानिक चार चाकी वाहनांना व शेतकऱ्यांच्या शेतमाल वाहतूक करणाऱ्या वाहनांना संपूर्णपणे



टोल माफी देण्याची मागणी जोरदारपणे करण्यात आली कंपनीच्या अधिकार्यांसोबत आंदोलकांनी आक्रमकपणे चर्चा करत येत्या ८ दिवसात स्थानिक वाहनांना टोल माफी नाही दिल्यास यापेक्षा आक्रमक आंदोलन करण्याचा इशारा देखील जिल्हाध्यक्ष कुलदीप यांनी दिला यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे केज युवा तालुकाध्यक्ष अतुल गवळी ,केज शहराध्यक्ष फेरोजभाई पठाण ,अजय वाघमारे, बाबा देशमुख, पिनू गोरे ,सोनू सूर्यवंशी ,दादासाहेब गुंड, महेश मोरे आदि पदाधिकारी ,वाहनधारक,शेतकरी उपस्थित होते. मंडळाधिकारी श्री.ढाकणे यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले .आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी केज पोलिसांनी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. टोलनाक्यावरील चक्काजाम आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही कडेला वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या. स्थानिक वाहनांना टोलमुक्त केल्याशिवाय ही लढाई थांबणार नाही .उपस्थित आंदोलकांनी एकजुटीने निर्धार केला.

## गावातील अवैध दारू विक्री बंद करा ; जवळबनच्या महिला आक्रमक

### घोषणाबाजी करत नारीशक्तीचा हल्लाबोल !



**केज दि १५(प्रतिनिधी) :** तालुक्यातील जवळबन येथे अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू होती. व्यसनाच्या आहारी गेल्याने अनेक जणांचा मृत्यू यापूर्वी झालेला आहे. अनेकांचे संसार उध्वस्त झाले या सततच्या पुरूषांच्या व्यसनाधीनतेला वैतागून गावातील सबंध महिलांनी एकत्र येऊन बुधवार रोजी सकाळी आठ वाजता आक्रोश रॅली गावात काढली. महिलांच्या पुढाकारानंतर पुरुष मंडळी यामध्ये सहभागी झाले.

गावात दारू विक्री करणाऱ्यांच्या घरावर थेट मोर्चा धडकला. यावेळी महिला आक्रमक होऊन घोषणाबाजी करत होत्या पूर्ण गावातून जनजागृती रॅली काढून जिल्हा परिषद शाळेच्या आवारात आक्रोश मोर्चाचा समारोप करण्यात आला. युसूफ वडगाव पोलीस स्टेशनचे पो कॉ महेश कोकाटे यांना चारशे महीलांच्या सह्याचे निवेदन देण्यात आले.

यावेळी व्यसनाधीन झालेल्या कुटुंबातील महिलांनी अक्षरशः हंबरडा फोडून व्यथा मांडल्या एवढ्या अनेक महिलांना अश्रू अनावर झाले होते.

सर्व संतप्त झालेल्या महिलांनी यापुढे अवैध दारू विक्री गावात आढळून आल्यास थेट हल्लाबोल करण्याचा इशारा दिला आहे

लहान मुलींनी वेदना मांडल्या

गावात दारू विक्री होऊ नये यामुळे आमचे वडील दारू पिऊन आम्हाला मारहाण करतात घरातील सगळ्या वस्तू विकतात आम्हाला खूप त्रास सहन करावा लागतो अशा वेदना लहान मुलींनी व्यक्त केल्या

**तरुणांचा सहभाग :** नारीशक्तीने लढा आक्रमक केल्यानंतर दारूबंदीच्या लढ्यात महिलांच्या मागोमाग तरुणांनी सहभाग नोंदवला तर अनेकांनी आपण यापुढे दारू पिणार नाही असा संकल्प करून गावात कुठेही दारू विक्री होऊ देणार नाही अशी थेट शपथ घेतली.

**सपोनि संदीप मांजरमे यांची अवैध दारू विक्रेत्यांवर थेट कारवाई :** गावात दारूबंदी मोहीम सुरू असताना दुसरीकडे काही अवैध दारू विकणारे विक्री करत होते या वेळेत युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी भेट देऊन दारू विक्रीच्या अड्ड्यावर जाऊन गावकऱ्यांच्या साथीने अवैध दारू विक्री करणाऱ्यांना ताब्यात घेतले यामध्ये पांडुरंग बाबुराव वैरागे, समाधान भगवान वैरागे, निलाबाई बंकट शिंदे यांच्यावर दारूबंदी अधिनियम कायद्याद्वारे कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू होती.

**यापुढे कोणीही गावात दारू विकाल तर याद राखा ! :** संतापलेल्या महिलांनी यापुढे कोणीही गाव परिसरात दारू विकाल तर याद राखा अशी घोषणाबाजी करत अवैध दारू विक्रेत्यांना इशारा दिला आहे

**दारूबंदी समितीची स्थापन :** गावातील अवैध दारू विक्री आणि दारू पिणाऱ्यांवर बंदी घालण्यासाठी सरपंच आणि गावकरी मिळून महिलांची दारूबंदी समिती तयार करण्यात आली आहे ही समिती यापुढे क्रियाशील पण एक काम करणार असण्याचे त्यांनी सांगितले. या लढ्यात महिला विद्यार्थी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

## विद्यार्थी, युवकांच्या प्रश्नी परळीत जोरदार निदर्शने

**परळी / प्रतिनिधी:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा पूर्ववत ऑफलाइन पद्धतीनेच घेण्यात याव्यात, सर्व शासकीय विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत व पेपर फुटी विरोधात कडक कार्यवाही करून भविष्यात पेपर फुटी होणार नाही याची काळजी घ्यावी, या मागण्यांना घेऊन सोमवार दि 13 रोजी भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ (DYFI) संघटनेच्या वतीने परळी मध्ये आंदोलन करण्यात आले.




या आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांनी सांगितले की, राज्य लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा जर ऑनलाईन पद्धतीने घेतली, तर त्याचा सर्वात मोठा फटका ग्रामीण भागातील गरीब आणि कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना बसणार आहे. ग्रामीण भागात इंटरनेटच्या सुविधा, वीज पुरवठा आणि ऑनलाईन परीक्षांचे तंत्रज्ञान अजूनही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेले नाही. अशा परिस्थितीत ऑनलाईन परीक्षेचा निर्णय म्हणजे ग्रामीण गुणवत्तेचा गळा घोटण्यासारखा आहे. त्यामुळे हा निर्णय तात्काळ रद्द झालाच पाहिजे.यासोबतच विविध शासकीय विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत, नीट परीक्षा असो की टीईटी परीक्षा या परीक्षा पेपर फुटी विरोधात कडक कार्यवाही करून भविष्यात पेपर फुटी होणार नाही याची काळजी घ्यावी.

यावेळी संघटनेचे जिल्हा सचिव विशाल देशमुख, प्रवीण देशमुख, तालुका अध्यक्ष विजय घुगे, मनोज देशमुख,मुंजा नवगरे,तालुका सचिव सिद्राम सोळंके, इस्माईल शेख, प्रशांत मस्के, सोपान सोळंके, मदन राठोड, प्रकाश कावळे,अशोक जाधव यांच्यासह शेकडो युवक आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

# प्रत्येक घरातुन भाकरी,पोळ्या जमा, 40 वर्षापासुन अविरतपणे अन्नदानाचा उपक्रम

### तीन हजार लोकवस्तीच्या निळा गावात 95 दिंड्यांतील सव्वालाख वारकर्यांना महिनाभरात महाप्रसाद

**परळी (प्रतिनिधी) :** आषाढी वारी पंढरपुरकरकडे निघालेल्या पायी दिंड्या गंगाखेड- परळी मार्गावर अधिक संख्येने प्रवास करतात.या मार्गावरील तीन हजार लोकवस्तीच्या निळा या गावात तब्बल एक महिना छोट्या-मोठ्या दिंड्यातील वारकर्यांच्या दुपार व संध्याकाळ महाप्रसादाबरोबरच मुक्कामाची व्यवस्था केली जाते.गावातील प्रत्येक घरातून भाकरी,गव्हाच्या पोळ्या गोळा करुन वारकर्यांना महाप्रसाद दिला जातो.निळा गावकर्यांचा वारकर्यांसाठी असलेला हा गोपाळकाला ४० वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे.



महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी आषाढी एकादशी निमित्त महाराष्ट्रासह मध्यप्रदेश मधुन पायी दिंड्या नांदेड, परभणी मार्गे परळीहुन पंढरपुरकडे रवाना होत असतात.गंगाखेड ते परळी या मार्गावर या दिंड्या एकवटतात.शेगाव येथील संत गजानन महाराज,संत गुलाबराव महाराज अशा मोठ्या दिंड्यामधील वारकर्यांची सामाजिक कार्यकर्ते व संस्थाकडुन महाप्रसाद आणि मुक्कामाची सोय केली जाते परंतु शेकडोंच्या संख्येने असलेल्या २०० ते एक हजार वारकर्यांचा सहभाग असलेल्या दिंडी साठी फारसे पुढे कोणी येत नाही.या दिंड्यांचे चालक हे काही दिवस अगोदर पालखी मार्गावरील गावात येवुन वारकर्यांसाठी सकाळ,दुपार व रात्रीच्या जेवणाची व्यवस्था करतात. परळीपासुन १५ कि.मी. अंतरावर असलेल्या निळा ता.सोनपेठ येथे आषाढी वारीतील पायी चालणार्या वारकर्यांसाठी तब्बल एक महिनाभर अन्नदानाचा महायज्ञ अविरतपणे सुरू आहे.यामध्ये परभणी, हिंगोली,नांदेड जिल्ह्यासह विदर्भ व मध्य प्रदेशातील दिंड्यांचा समावेश आहे. पंढरपुरकडे निघालेला एकटा वारकरीही निळा या गावातुन उपाशी जात नाही.दहा वारकर्यांच्या दिंडी पासुन दोन हजार वारकरी असलेल्या दिंडी साठी निळा गावकरी एकत्र येत भोजन व मुक्कामाची व्यवस्था करत आहेत.यावर्षीच्या आषाढी पायी सोहळ्यातील निळा गावात दि.१४ जुलै रोजी विदर्भातील पायी दिंडी ही शेवटची मोठी आहे.

प्रत्येक घर,व्यक्तीचा सहभाग

पायी दिंडीतील वारकर्यांच्या व्यवस्थेत निळा गावातील प्रत्येक घर,व्यक्ती सहभागी असतो. वारकर्यांच्या संख्येवर सकाळी न्हाव्याकडुन घरोघरी जाऊन भाकरी,पोळ्या करण्याच्या सुचना केल्यानंतर भजनी मंडळातील सदस्य या भाकरी,पोळ्या एकत्रित करतात.हनुमान मंदिराच्या प्रांगणात वार्षीक सप्ताहातुन उरलेल्या पैशामधुन वरण,भात,भाजी केल्यानंतर हा गोपाळकाला वारकर्यांना दिला जातो.

व्यवस्थेसाठी ३० जणांची टिम

गावात येणार्या दिंड्यांची नोंदणी,गावातुन भाकरी जमा करण्यापासुन महाप्रसादानंतर भांडी व परिसराची स्वच्छता यासाठी निळा भजनी मंडळ व गावातील २० ते ३० युवक ज्यांना जसे जमेल तसा सहभाग नोंदवतात. आषाढी वारी करत असलेला एकही वारकरी आपल्या गावातुन उपाशीपोटी जाऊ नये यासाठी निळा गावातील ज्येष्ठांनी ४० वर्षापुर्वी सुरु केलेला अन्नदानाचा हा महायज्ञ एक महिनाभर अविरतपणे सुरु असतो.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बोगस बियाणे विक्रीविरोधात क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे अनोखे आंदोलन

## जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयात पैसे फेकून केला निषेध



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर बोगस बियाणे तसेच बोगस जैविक कीटकनाशकांची विक्री होत असल्याचा आरोप करत क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात प्रतीकात्मक स्वरूपात पैसे फेकून कृषी विभागाच्या कथित निष्क्रियतेविरोधात निषेध नोंदविण्यात आला.

यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी असा आरोप केला की, जिल्ह्यात शेतकऱ्यांची फसवणूक होत असतानाही कृषी विभागाकडून प्रभावी कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

पावसाने दडी मारल्यामुळे तसेच बोगस बियाणांमुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे. शेतकरी आर्थिक आणि मानसिक संकटात सापडला आहे. कृषी विभाग मात्र बोगस बियाणे व बोगस जैविक किटकनाशकांची विक्री करणाऱ्यावर कारवाई करीत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आंदोलनादरम्यान संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी असा आरोप केला की, जर कृषी विभागाला कारवाईसाठी पैसेच हवेत, तर आम्ही पैसे द्यायलाही तयार आहोत; मात्र शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या बोगस बियाणे व जैविक कीटकनाशक विक्रेत्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी. असे त्यांनी म्हटले.

संघटनेने प्रशासनाला इशारा देत सांगितले की, बोगस कृषी निविष्ठांविरोधात तातडीने कठोर कारवाई झाली नाही, तर शेतकऱ्यांच्या न्यायासाठी मुंबईतील अरबी समुद्रात जलसमाधी आंदोलन करण्याचा निर्णय घ्यावा लागेल. त्यास सर्वस्वी सरकार व कृषी प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे, तालुका अध्यक्ष प्रवीण मते, चैतन्य चव्हाण, रमेश जाधव, प्रवीण घुमणार, विशाल पोळ आदी उपस्थित होते

# जयभवानी शेतकरी विकास पॅनलला विजयी करा- वरडपूडकर

## परभणी जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक निवडणूक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीच्या निमित्ताने जयभवानी शेतकरी विकास पॅनेलच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ हिंगोली येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पॅनेलच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन माजीमंत्री सुरेशराव वरपुडकर यांनी केले.

या प्रचार सभेला राज्यसभा खासदार रामराव वडकुते, माजी मंत्री सुरेशरावजी वरपुडकर, माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, आमदार तान्हाजीराव मुटकुळे, आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव, आमदार संतोषराव बांगर, आमदार डॉ. राहुल पाटील, जिल्हा बँकेचे संचालक राजेश पाटील गोरेगावकर, सौ.राजमती मुटकुळे, दिलीप चव्हाण, के. के. शिंदे, बाबाराव बांगर आणि भाजयुमो जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, विजय जामकर, शोभा बोबडे, दत्तात्र मायंदके, राजवर्धन पाटील, प्रकाशराव थोरात, नारायण खेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सभेला संबोधित करताना माजी मंत्री सुरेशराव वरपुडकर यांनी सांगितले की, जिल्हा बँकेच्य माध्यमातून शेतकऱ्यांचा आणि जिल्ह्याचा विकास साधण्यासाठी जयभवानी शेतकरी विकास पॅनेलच्य पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची गरज आहे. बँकेचा कारभार पारदर्शक आणि शेतकरी हिताच करण्यासाठी या पॅनेलचे सर्व उमेदवार कटिबद्ध आ-हेत. याप्रसंगी जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील प्रमुख नेते, कार्यकर्ते आणि मतदार उपस्थित होते.

# अवैध गौण खनिज, वाळू चोरी करणाऱ्याविरूध्द कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

औंढा नागनाथ ते हिंगोली रस्त्यावर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रात्री गस्त घालीत असतांना अवैध गौण खनिज व वाळूची चोरटी वाहतुक करतांना एक टिप्पर पकडले असून १४ लाख १५ हजारांचा मुद्देमाल व दोघांना अटक करण्यात आली आहे.

पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंद्याविरूध्द मोहीम सुरू असून वाळु माफीयांविरूध्दही जोरदार मोहीम उघडण्यात आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहीतीन-ुसार दि १४ स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, उपनिरीक्षक दिलीप मोरे, अंमलदार भुजंग कोकरे, नितीन गोरे, साईनाथ कंठे, चालक शिवाजी इंगोले हे पेट्रोलिंगवर असतांना औंढा नागनाथ ते हिंगोली रोडवरील देशमुख पेट्रोलपंपासमोर अवैध वाळूची चोरटी वाहतुक करणारे टिप्पर पकडले. यावेळी चालक आंबादास राठोड रा शिरकुटी जि वाशिम, अक्षय भुसांडे रा गवळीपुरा हिंगोली यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी टिप्पर अंदाजे किंमत १४ लाख व ३ ब्रास अवैध वाळू १५००० रूपये असा एकुण १४ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अमृत सक्षम उपक्रमातून कचरा व्यवस्थापन क्षेत्रात उद्योजकतेला चालना




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

राज्यात वाढते शहरीकरण, पर्यावरण संवर्धनाची गरज आणि हरित उद्योगांना मिळण-ारे प्रोत्साहन लक्षात घेता कचरा व्यवस्थापन क्षेत्रात रोजगार व उद्योजकतेच्या नव्या संधी उप-लब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) आणि कुशाग्रा इनोव्हेशन्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'अमृत-सक्षम' हा विशेष उद्योजकता विकास उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत इच्छुक युवक-युवती, महिला, महिला बचत गट, उद्योजक व व्यावसायिकांना योग्य व्यवसायाची निवड, आर्थिक नियोजन, बँक कर्ज प्रक्रिया, शासकीय अन-ुदान योजनांची माहिती, उद्योग उभारणीसाठी आवश्यक तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन तसेच उत्पादनांच्या विक्रीसाठी बाज-ारपेठ उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाणार आहे.

कचरा व्यवस्थापन हे केवळ स्वच्छतेपुरते मर्यादित नसून त्यामध्ये रिसायकलिंग, रिस-ोर्स रिकव्हरी सेंटर (ठठठ), प्लास्टिक, कागद व काच पुनर्वापर, सेंद्रिय कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मिती, अगरबत्ती व धूपनिर्मिती यांसारख्या विविध शाश्वत उद्योगांच्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे या क्षेत्रातून स्वावलंबनाबरोबरच पर्यावरण संरक्षणालाही मोठी चालना मि ळणार आहे.

या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांना प्रशिक्षणानंतर अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग उभारणीसाठी आवश्यक सहाय्य, नेटवर्किंग तसेच बाजारपेठेशी जोडणीचं सुविधा उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यामुळे हरित उद्य-ोग क्षेत्रात नवीन व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्यांसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

'अमृत-सक्षम' उपक्रमामध्ये युवक-युवती, महिला बचत गट, विद्यमान उद्योजक, व्यावसायिक, सामाजिक संस्था तसेच पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या नागरिकांनी सहभागी होऊन ऑनलाइन नोंदणी करावी आणि हरित उद्योग क्रांतीचा भाग बनावे. अधिक माहितीसाठी अमृत जिल्हा कार्यालय, हिंगोली (मो. ७३९१०६५४७१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### शिरड शहापूर येथे एसआयआर कामाला गती



औंढा नागनाथ- तालुक्यातील शिरड शहापूर येथील, एस आय आर चे काम पूर्ण ताकदीने चालू असून त्यामध्ये दि १४ रोजी शिरड शहापूर येथे रजा मोहल्ला शिरड शहापूर येथील सर्व पाच बीएलओ यांना एकत्रित बोलावून संबंधित सर्व जनतेस फॉर्म डिजिटल करून भरून देण्यासाठी जनतेला आवाहन करण्यात आले होते. यावेळी सर्व एकात छताखाली असल्याने जास्तीत जास्त ई एफ फॉर्म भरून घेण्यात आले आहे व भरून फॉर्म डिजिटल करण्यात आलेले आहे. यामुळे तालुक्याचा अव्वल क्रमांक जिल्ह्यामध्ये दिसून येतोय हे सर्व संबंधित कामे करताना नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, तलाठी श्रीमती स्वामी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते तसेच शिरडशापुर गावातील सर्व पाच बीएलओ, पत्रकार अहमद पठाण यांची उपस्थिती होती.

### माजी शिक्षण उपसंचालकांची भेट



हिंगोली- येथील भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेद्वारा संचलीत श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात माजी शिक्षण उपसंचालक एम के देशमुख व माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार यांनी सदीच्छा भेट दिली. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी एम के देशमुख यांनी शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी एस आर वाबळे, टी एस खिल्लारे, एस के जोंधळे, व्ही यु शिंदे, जे ए लोसरवार, ए एल कापसे, एस बी रत्नपारखी, गजानन बांगर, पी के राऊत, सौ सराफ, श्रीमती गेजलवाड, आर एन पाचरणे, श्रीमती नाईक आदींची उपस्थिती होती.



हिंगोली- येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्रीसाठी आलेल्या वाहनांची रांग दिसत आहे.

# राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ. शशीकांत शिंदे आज हिंगोली दौऱ्यावर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे हे दिनांक १६ जूलै २०२६ गुरुवार रोजी हिंगोली जिल्हा दौऱ्यावर येणार असून दुपारी १:३० वाजता राष्ट्रवादी भवन,हिंगोली येथे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक घेऊन मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष माजी सहकार मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, आमदार सुनील भुसारा, हिंगोली जिल्हा निरीक्षक पंकज बोराडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या बैठकीला हिंगोली जिल्ह्या-तील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे पदाधिकारी,लोकप्रतिनिधी, शेतकरी-शेतमजूर-कामगार, विद्यार्थी-युवक, महिला, अल्पसंख्यांक, ओबीसी, मागासवर्गीय, शिक्षक, वकील, डॉक्टर, व्यापारी आघाडीचे कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष ॲड. रवि शिंदे, विधानसभा अध्यक्ष बंडू मुटकुळे, गणेशराव गडदे, माजी जि.प. उपाध्यक्ष मनीष आखरे, माधव कोरडे, युवक जिल्हाध्यक्ष सोनू चव्हाण, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष व्यंकटेश जोगदंड, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष आयुबभाई पठाण, अनुसूचित जाती आघाडी जिल्हाध्यक्ष भास्कर कुरे, तालुकाध्यक्ष डॉ. संतोष बोंढारे, धीरज काकडे, यशवंतराव देशमुख, गजानन गव्हाणे, शहराध्यक्ष मुजीब पठाण मोईन बागवान, ॲड.शेख मोहसिन, दिलीपराव राखोंडे, सिराजभाई कुरेशी, आनंदराव कदम, अभिजीत देशमुख, डॉ.वेदांत म रळे, प्रा.गजानन थोरात, युवक तालुकाध्यक्ष सुशील बोंढारे, शोएब सिद्दीकी, राजू बाभळे, सुनील मस्के, गणेशराव लेकुळे, प्रभू शिंदे, प्रफुल पाईकराव, लक्ष्मण पोटे, सुदर्शन वायकोळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हिंगोली जिल्हा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# हिंगोली रोजगार मेळाव्याला बेरोजगार युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

येथील कै शिवाजीराव देशमुख सभागृहात दि १५ जुलै रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याहस्ते करण्यात आले. या मेळाव्याला मोठ्या संख्येने बेरोजगार युवक आणि युवतींनी हजेरी लावली होती.

या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील २० हून अधिक नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या सहभागी होणार असून, विविध पदांसाठी २ हजारांहून अधिक रिक्त पदे उपलब्ध असतील. दहावी, बारावी उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण, आयटीआय, डिप्लोमा, अभियांत्रिकी, सर्व शाखांतील पदवीधर, सीएनसी ऑपरेटर, सिपेट तसेच इतर पात्र उमेदवारांसाठी रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत. अनेक युवक युवतींना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

# शासकीय कार्यालयांच्या प्रत्यक्ष भेटीद्वारे विद्यार्थ्यांना मिळणार माहीती

## जिल्ह्यात अमृत संवाद सेतू उपक्रम सुरू




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जुलै**

विद्यार्थ्यांना प्रशासनाची कार्यपद्धती, शासकीय कार्यालयांचे कामकाज, नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये यांची प्रत्यक्ष माहिती मिळावी तसेच विद्यार्थी आणि प्रशासन यांच्यात विश्वासाचे नाते अधिक दृढ व्ह-ावे, या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या माध्यम ातून 'अमृत संवाद सेतू' हा अभिनव उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पोलीस प्रशासन तसेच विविध शासकीय विभागांना प्रत्यक्ष भेट देण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. संबंधित विभागांचे अधिकारी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून कार्यालयीन कामकाजाची कार्यपद्धती, शासनाच्या विविध योजना, नागरिकांना उपलब्ध असलेल्या सेवा तसेच प्रशासनातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाबाबत सविस्तर माहिती देणार आहेत.

'अमृत संवाद सेतू' उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जबाबदारीची जाणीव, संविधानिक मूल्यांबाबत आदर, लोकशाही प्रक्रियेबाबत सकारात्मक दृष्टिकोन आणि सुजाण नागरिकत्वाची भावना विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना प्रशास-नाशी थेट संवाद साधून विविध विषयांवरील शंका मांडण्याची व त्यांचे निरसन करून घेण्याची संधीही उपलब्ध होणार आहे.

विद्यार्थी आणि प्रशासन यांच्यात प्रभावी संवाद निर्माण करून परस्पर विश्वास अधिक दृढ करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून, भविष्यात जबाबदार, जागरूक आणि राष्ट्रहिताची जाणीव असलेले नागरिक घडविण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांनी व्यक्त केला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांनी अमृत जिल्हा कार्यालय, हिंगोली (मो. ७३९१०६५४७१) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एसआयआर कार्यक्रमांतर्गत मतदारांनी गणना पत्रक भरून द्यावेत : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ जुलै -**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (डखठ-२०२६) कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्ह्यात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इङज) यांच्या माध्यमातून एर्पीाशीरींळेप ऋीा (एऋ) चे घरपोच वितरण, संकलन व डिजिटायझेशन करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र मतदाराने आपले नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होण्यासाठी ईएफ (एऋ) फॉर्म भरून संबंधित बीएलओकडे जमा करणे अनिवार्य आहे.

ईएफ फॉर्म भरून जमा न करणाऱ्या मतदारांचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने वेळेत गणनापत्रक भरून निवडणूक विभागास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

ज्या मतदारांची नावे चर्रशिव, णपारर्शिव व पोरश्रळशी या प्रवर्गांमध्ये आहेत, त्या सर्व मतदारांनीदेखील ईएफ फॉर्म भरणे आवश्यक आहे. पोरश्रळशी प्रवर्गातील मतदारांनी ईएफ फॉर्म भरून दिल्यास त्यांचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट केले जाईल. त्यानंतर दावा व हरकतीच्या कालावधीत सुनावणीदरम्यान भारत निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या ११ प्रकारच्या पुराव्यांपैकी आवश्यक पुरावे सादर केल्यानंतर पात्र मतदारांचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात येईल.

एसआयआर-२०२६ मोहिमेला अधिक गती देण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी स्वतः विविध विधानसभा मतदारसंघांमध्ये क्षेत्रीय भेटी देऊन ईएफ फॉर्मचे वितरण, संकलन व डिजिटायझेशनच्या कामाचा आढावा घेत आहेत. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन कामाची गती वाढविण्यावर भर देत आहेत.

दरम्यान, महापालिका आयुक्त तथा अतिरिक्त निवडणूक अधिकारी यांनी ८६-नांदेड उत्तर व ८७-नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची (एठज) बैठक घेऊन महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी, बिल कलेक्टर तसेच इतर कर्मचाऱ्यांनी शहरी भागातील बीएलओंना आवश्यक सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याशिवाय प्रत्यक्ष क्षेत्रीय भेटी देऊन कामाचा वेग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत.

दि. १५ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंतच्या अहवालानुसार नांदेड जिल्ह्यात एकूण २७,७७,०७३ मतदारांपैकी २०,६६,७७१ मतदारांना ईएफ फॉर्मचे वितरण पूर्ण झाले असून, ही टक्केवारी ७४.४२ इतकी आहे. तसेच १२,३९,६९७ ईएफ फॉर्मचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असून त्याची टक्केवारी ४४.६४ आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व मतदारांना आवाहन केले आहे की, आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडून (इङज) प्राप्त झालेला ईएफ फॉर्म तात्काळ भरून आवश्यक माहिती अचूकपणे सादर करावी. मतदार यादी अद्ययावत, अचूक व सर्वसमावेशक करण्यासाठी प्रत्येक मतदाराचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने वेळेत ईएफ फॉर्म भरून लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

# किनवट शहरात 'चिडीमार गस्त' पथकाची कारवाई सुरू; शाळा-महाविद्यालय परिसरात रोडरोमिओंवर पोलिसांची करडी नजर

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १५ जुलै -**



विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच शाळा, महाविद्यालय व ट्युशन परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी किनवट पोलिसांनी विशेष 'चिडीमार गस्त' (nti-Romeo Squad) मोहीम सुरू केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील तथा उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या नेतृत्वात ही विशेष गस्त राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत शाळा, महाविद्यालये, ट्युशन क्लासेस तसेच विद्यार्थ्यांची वर्दळ असलेल्या परिसरात नियमित गस्त घालून टवाळखोर, रोडरोमिओ व संशयित व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. विद्यार्थिनींना छेडछाड, पाठलाग किंवा इतर कोणत्याही प्रकारचा त्रास देणाऱ्यांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

या विशेष पथकात पोलीस उपनिरीक्षक लेंगुळे, पोलीस कर्मचारी कुडमेते, चव्हाण, महिला पोलीस कर्मचारी पुरके व अन्कमवार यांचा समावेश असून ते विविध शैक्षणिक संस्थांच्या परिसरात नियमित गस्त घालत आहेत. यावेळी पोलिसांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांनाही इशारा दिला आहे. भरधाव वेगाने वाहन चालविणे, मोटारसायकलने धोकादायक पद्धतीने 'कट' मारणे, स्टंटबाजी करणे किंवा सार्वजनिक शांततेला बाधा आणणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

तसेच अल्पवयीन मुलांनी किंवा विनापरवाना वाहन चालविताना आढळल्यास मोटार वाहन कायद्यानुसार १०,००० पर्यंत दंड, तसेच संबंधित पालक किंवा वाहनमालकांवरही कायदेशीर कारवाईची तरतूद असल्याची माहिती पोलिसांनी दिली. नियमांचे उल्लंघन सुरूच राहिल्यास अधिक कठोर पावले उचलण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, शिस्तबद्ध व अभ्यासू विद्यार्थ्यांना या कारवाईमुळे कोणताही त्रास होणार नाही, याची पोलिसांकडून विशेष दक्षता घेतली जात असून पालकांनी विनाकारण चिंता करू नये, असे आवाहन किनवट पोलिसांनी केले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी ही मोहीम नियमितपणे सुरू राहणार असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले.

## डॉ. जनार्दन वाडेकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त

**नांदेड** -राजर्षी शाहू विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, वसंतनगर नांदेड येथे श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या १०६ व्या जयंतीचे औचित्य साधून आणि कै.डॉ. जनार्दन वाडेकर यांच्या तेराव्या पुण्यतिथीच्या कार्यक्रम प्रसंगी त्यांच्या स्तुषा प्रसिद्ध स्त्रीरोगज्ज्ञ डॉ. गायत्री वाडेकर



यांनी गरजवंत, प्रज्ञावंत, गुणवंत, होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. यामध्ये ३१ विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, स्कूल बॅग आणि वह्यांचे वाटप करून गरजवंत विद्यार्थ्यांना यशस्वीतेचा हात पुढे केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी कै.डॉ. शंकरराव चव्हाण व कै. डॉ. जनार्दन वाडेकर यांच्या प्रतिमेचे पुष्पपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक सुभाष तिवडे होते. यावेळी मराठवाडा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव कदम, सचिव चंद्रशेखर सोनवणे, जि.प. नांदेडचे शिक्षणाधिकारी (मा.) माधवराव सलगर, सुप्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. खुरसाळे आणि दुपारसत्र प्रमुख बालाजी कदम यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. गायत्री वाडेकर यांनी कै.डॉ. जनार्दन वाडेकर यांच्या स्मृतींना उजाळा दिला. तसेच शिक्षणाधिकारी माधवराव सलगर यांनी डॉ. गायत्री वाडेकर यांच्या दातृत्वाचा उल्लेख करत आवडीच्या विषयाचा आणि कठीण विषयाचा अभ्यास कसा करावा, याविषयी सखोल मार्गदर्शन केले. डॉ. खुरसाळे यांनी कै.डॉ. जनार्दन वाडेकर व त्यांच्या मैत्रीचे अनेक किस्से विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष तिवडे यांनी कै.डॉ. शंकरराव चव्हाण आणि कै.डॉ. जनार्दन वाडेकर यांनी समाजहितासाठी स्थापन केलेल्या शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक संस्थांचा उल्लेख करत राजर्षी शाहू महाराजांचा खर्या अर्थाने वसा आणि वारसा या दोन्ही विभूतींनी चालवला, असे प्रतिपादन केले. सूत्रसंचालन शिवानंद टापरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. माणिक गाडेकर यांनी मानले.

## महात्मा फुले हायस्कूलच्या एनसीसी एअर विंगची दैदिप्यमान कामगिरी



**नांदेड** -महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर, नांदेड येथील ३ MH IR SQN NCC, Pune अंतर्गत कार्यरत एनसीसी एअर विंग विभागाने सी.ए.टी.सी.-७१६ (Combined nnual Training Camp-२०२६) मध्ये दुहेरी यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. दि. ५ ते १४ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित या शिबिरात महाराष्ट्रातील ११ शाळांच्या एनसीसी पथकांनी सहभाग घेतला होता. शिबिरातील अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या मेन ड्रिल स्पर्धेत महात्मा फुले हायस्कूलच्या कॅडेट्सनी उत्कृष्ट शिस्त, अचूक संचलन आणि प्रभावी समन्वयाचे दर्शन घडवत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे शाळेसह नांदेड जिल्हा आणि ३ चक खठ डटछ छउउ, झीपश युनिटच्या नावलौकिकात भर पडली आहे.या यशामागे एनसीसी एअर विंगचे ए.एन.ओ. दत्ता बारसे यांचे नियोजनबद्ध प्रशिक्षण, कठोर परिश्रम आणि विद्यार्थ्यांवर केलेले सातत्यपूर्ण मार्गदर्शन हे प्रमुख कारण ठरले. गेल्या बारा वर्षांपासून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्व, देशभक्ती आणि सेवाभावाची मूल्ये रुजवत अनेक कॅडेट्सना राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवून दिले आहे. याच शिबिरादरम्यान त्यांच्या उत्कृष्ट सेवाकार्याची दखल घेत सेकंड ऑफिसर पदावरून 'फर्स्ट ऑफिसर' या उच्च पदावर त्यांची पदोन्नती जाहीर करण्यात आली. ३ चक खठ डटछ छउउ, झीपश चे कमांडिंग ऑफिसर विंग कमांडर एस. एस. मराठे आणि विंग कमांडर अर्पण चंदा यांच्या हस्ते त्यांना पदोन्नतीचे चिन्ह प्रदान करण्यात आले. फर्स्ट ऑफिसर दत्ता बारसे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कॅडेट्सनी विविध प्रशिक्षण शिबिरे, सामाजिक उपक्रम आणि राष्ट्रीय स्तरावरील एनसीसी स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, नेतृत्वगुणांच्या संवर्धनासाठी आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे मानले जाते.महात्मा फुले हायस्कूलच्या एनसीसी एअर विंगची ही दुहेरी कामगिरी संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली असून, भविष्यातही या विभागाकडून अशीच उज्ज्वल कामगिरी घडत राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. फर्स्ट ऑफिसर दत्ता बारसे यांना पदोन्नतीबद्दल तसेच मेन ड्रिल स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या सर्व कॅडेट्स व प्रशिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष अशोकराव चव्हाण, उपाध्यक्ष अमिता चव्हाण, सचिव डी. पी. सावंत, सहसचिव डॉ. रावसाहेब शिंदारकर, कोशाध्यक्ष उद्धवराव निंबाळकर, कार्यकारी सदस्य श्रीजया चव्हाण व नरेंद्र चव्हाण, महात्मा फुले हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सुरेखा कदम, उपमुख्याध्यापक अण्णा गरड तसेच विविध स्तरांतील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# नांदेड जिल्हयातील व्यावसायीक वाद दाखल होण्यापूर्वीच सामोपचाराने मिटविण्यात यश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ जुलै -**

व्यावसायिक वाद खटल्यापूर्वी मध्यस्थी द्वारे सामोपचाराने मिटविण्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला यश आले असून, जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच असा वाद मिटविण्यात आले आहे.

हे प्रकरण नांदेड शहरातील नामांकित शैक्षणिक व धर्मदाय संस्था असलेल्या दोन संस्थेत एका आर्थिक व्यवहारावरून वाद उद्भवला होता. सहकार न्यायालयात प्रकरण दाखल होण्यापूर्वी कलम १२-ए, व्यावसायीक न्यायालय अधिनियम-२०१५ प्रमाणे सदरील प्रकरण जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे सामोपचाराने मिटविण्याच्या दृष्टीने मध्यस्थीसाठी आले होते. सदरील प्रकरणातील गांभिर्य विचारात घेता, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष व प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव शरद जी. देशपांडे यांनी प्रशिक्षीत मध्यस्थ ड. एच.व्ही. संतान, यांचा अनुभव पाहता त्यांची मध्यस्थ म्हणून नियुक्ती केली.

सर्वप्रथम मध्यस्थाने दोन्ही बाजुंचे म्हणने ऐकुन घेऊन, मध्यस्थी प्रकरण केंद्र, मुंबई यांच्यातर्फे आत्मसात केलेल्या विविध कौशल्यांचा वापर करून दोन्ही बाजुंना सदरील वाद सामोपचाराने मिटविण्यासाठी दोन्ही पक्षकारांचा वेळ व पैसा कसा वाचेल यावर त्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांना वाद न्यायालयात दाखल होण्यापूर्वी मिटवून घेण्याचा सल्ला दिला. यासाठी एकत्र, वेगवेगळया अशा तीन बैठका झाल्यानंतर मध्यस्थीला यश येऊन दोन्ही बाजुंनी दिनांक १३ जुलै २०२६ रोजी सामोपचाराने वाद मिटविला. सदरील प्रकरण खटल्यापूर्वीची मध्यस्थता (Pre-institution Mediation) प्रकारातले होते. नांदेड जिल्ह्याच्या न्यायिक इतिहासात प्रथमच व्यावसायिक वाद हा मध्यस्थीद्वारे मिटविण्यात यश आले असून, याकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिरकण सचिव शरद जी. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षीत मध्यस्थ ड. एच.व्ही. संतान यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विभागीय कार्यालय नांदेड येथे खा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ जुलै -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त नांदेड विभागीय कार्यालयात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याअंतर्गत विभागीय कार्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाचा शुभारंभ लोकसभा सदस्य खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. यावेळी त्यांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन केले. वृक्षारोपण ही काळाची गरज असून भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवाई जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. सदर कार्यक्रम विभाग नियंत्रक अभय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरातील आगार व विभागीय कार्यालयांमध्ये वृक्षारोपणासह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नांदेड विभागीय कार्यालयात हा उपक्रम उत्साहात पार पडला.

या प्रसंगी नांदेड शहरातील वर्कशॉप भागात असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यालय परिसरात खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमात विभागीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच एसटी महामंडळाने आपल्या ७८ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकीही अधोरेखित केली. उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन करण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त केला.

# भाजप जिल्हा सचिव सुप्रिया मुनेश्वर यांनी घेतली विजया रहाटकर यांची भेट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ जुलै -**

जिल्ह्यातील न्यायालयात प्रलंबित असलेल्या पीडित महिलांच्या खटल्यांना गती मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांची भाजपच्या जिल्हा सचिव सुप्रिया मुनेश्वर बाभळीकर यांनी एका कार्यक्रमा दरम्यान नांदेड येथे सदिच्छा भेट घेऊन यासंदर्भात सविस्तर चर्चा केली.



या भेटीदरम्यान सुप्रिया बाभळीकर यांनी जिल्ह्यातील काही पीडित महिलांच्या न्यायालयीन लढ्याची माहिती रहाटकर ताईंना दिली. अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायप्रविष्ट असल्याने महिलांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर रहाटकर यांनी पीडित महिलांना कायदेशीर मदत, समुपदेशन आणि आवश्यक त्या ठिकाणी हस्तक्षेप करून लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी आयोगाच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन दिले. तसेच अशा प्रकरणांमध्ये जिल्हा प्रशासन आणि पोलिस यंत्रणेशी समन्वय साधून पाठपुरावा करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

महिलांच्या न्यायासाठी आणि सन्मानासाठी धडाडीने काम करणारे नेतृत्व महाराष्ट्राला लाभणे ही राज्यासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी सुप्रिया मुनेश्वर बाभळीकर यांनी व्यक्त केली.

या भेटीमुळे जिल्ह्यातील पीडित महिलांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांच्या न्यायाच्या लढ्याला बळ मिळाले आहे.

# आ. केराम यांच्या पाठपुराव्याला यश; भरडधान्य खरेदीस मुदतवाढ

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १५ जुलै -**



किनवट-माहूर मतदारसंघातील भरडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत रब्बी पणन हंगाम २०२५-२६ अंतर्गत मका, ज्वारी, बाजरी व रागी या भरडधान्यांच्या शासकीय खरेदीस ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या निर्णयासाठी आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा विभाग तसेच पणन मंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. किनवट व माहूर तालुक्यात खरेदी प्रक्रिया उशिराने सुरू झाल्याने अनेक शेतकऱ्यांना विहित मुदतीत धान्य विक्री करता आली नव्हती. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेऊन आमदार केराम यांनी मुदतवाढीची मागणी केली होती. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर राज्य शासनाने १५ जुलै रोजी आदेश जारी करून भरडधान्य खरेदीची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढविली. त्यामुळे उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही हमीभावाने आपला माल विकण्याची संधी उपलब्ध झाली असून, या निर्णयाचे शेतकऱ्यांनी स्वागत करत शासन आणि आमदार भीमराव केराम यांचे आभार मानले आहेत.

# हिमायतनगर तालुक्यातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १५ जुलै -**

तालुक्यात जून महिन्यात झालेल्या अल्प पावसावर अनेक शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली. १६ ते २० जूनदरम्यान काही ठिकाणी, तर २२ ते २६ जूनदरम्यान उर्वरित भागात पेरण्या झाल्या. मात्र, केवळ चार ते सहा इंच पावसावर झालेल्या पेरणीमुळे जमिनीच्या वरच्या थरातच ओलावा राहिला असून खालची जमीन अद्याप कोरडी आहे. गेल्या दहा दिवसांपासून पावसाने खंड दिल्याने सोयाबीन, कापूस, मूग, उडीद, हळद आदी पिकांनी माना टाकल्या असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

जून महिन्यात ओलाव्यावर वरच्या अनेक शेतकऱ्यांनी हळदीची लागवड केली. मात्र, विहिरी व बोअरवेलमध्ये पुरेसे पाणी नसल्याने अनेक ठिकाणी हळदीची उगवणच झाली नाही. यंदा तालुक्यात हळदीखालील क्षेत्रात सुमारे दीडपट वाढ झाली असली, तरी पाण्याअभावी हे पीक संकटात सापडले आहे.

यावर्षी शासनाने हळद पिकासाठी प्रथमच पीकविमा योजना लागू केली आहे. मात्र, एका हेक्टरसाठी सुमारे नऊ हजार रुपये विमा हप्ता भरावा लागत असल्याने अल्पभूधारक व लहान शेतकऱ्यांसाठी हा खर्च परवडणारा नसल्याची भावना व्यक्त होत आहे. मोठ्या शेतकऱ्यांकडूनही विमा हप्त्याच्या रकमेबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. पावसाळ्याचा दीड महिना उलटूनही तालुक्यातील नदी-नाले कोरडेच असून विहिरी व बोअरवेलना अपेक्षित पाणी आलेले नाही. अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाली असून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. शेतकऱ्यांना बोअरवेलमधून पाणी काढून जनावरांना पाजावे लागत असून उपलब्ध पाण्यावरच पिके वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# घरबसल्या परिवहन विभागाच्या ५८ फेसलेस सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ जुलै -**

परिवहन विभागामार्फत वाहन परवाना (लायसन्स) व वाहन नोंदणीसंबंधी सेवा अधिक पारदर्शक, सुलभ आणि कालबद्ध पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी 'सारथी ४.०' आणि 'वाहन ४.०' या ऑनलाइन संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या प्रणालीद्वारे नागरिकांना घरबसल्या विविध सेवांसाठी अर्ज करता येत असून, त्यापैकी ५८ सेवा फेसलेस पद्धतीने उपलब्ध असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांतराव साळी यांनी दिली आहे.

पूर्वी वाहन व अनुज्ञप्ती संदर्भातील अर्ज प्रत्यक्ष कार्यालयात येऊन सादर करावे लागत होते. त्यामुळे काही वेळा अनधिकृत व्यक्ती किंवा मध्यस्थांकडून नागरिकांची फसवणूक होण्याची शक्यता होती. मात्र, केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार विकसित करण्यात आलेल्या ऑनलाइन प्रणालीमुळे नागरिकांना आधार क्रमांक व त्यास संलग्न मोबाईल क्रमांकाच्या आधारे कार्यालयात न जाता घरबसल्या अर्ज करता येत आहेत. कार्यालयामार्फत अर्जांची ऑनलाइन पडताळणी करून मंजुरी अथवा नामंजुरीची कार्यवाही नियमितपणे केली जाते.

परिवहन विभागाच्या एकूण ११५ अधिसूचित सेवांपैकी ८९ सेवा ऑनलाइन उपलब्ध असून, अनुज्ञप्तीसंदर्भातील सेवा सारथी पोर्टलवर, तर वाहनसंबंधी सेवा वाहन पोर्टलवर दिल्या जातात. यापैकी ५८ सेवा पूर्णपणे फेसलेस स्वरूपात उपलब्ध आहेत.

नागरिकांनी ऑनलाइन अर्ज करताना पोर्टलवर नमूद केलेले शासकीय शुल्क व कर इतकीच रक्कम ऑनलाइन भरावी. कोणत्याही अनधिकृत व्यक्ती किंवा मध्यस्थाला अतिरिक्त शुल्क देऊ नये. अतिरिक्त रकमेची मागणी होत असल्यास तत्काळ प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड येथे अनधिकृत व्यक्तींच्या प्रवेशास प्रतिबंध करण्यात आला असून, नागरिकांच्या वाहन व अनुज्ञप्तीसंबंधी अडचणी सोडविण्यासाठी माहिती व मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे. नागरिकांनी उपलब्ध ५८ फेसलेस सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### शेतातील विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू : पालम तालुक्यातील गुळखंड येथील घटना

**परभणी,/प्रतिनिधी :** उसाच्या शेतातील पिकाचे रानडुकरांपासून संरक्षण करण्यासाठी शेताभोवती लावलेल्या तारांमध्ये सोडलेल्या विद्युत प्रवाहाचा जोरदार धक्का लागून पती-पत्नीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी (दि. १४) सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास पालम तालुक्यातील गुळखंड येथे घडली.

आशाबी महेबुब पठाण (वय ३५) व महेबुब मदारसाब पठाण (वय ४०, रा. फरकंडा, ता. पालम) अशी मृतांची नावे आहेत. याबाबत मयतांचे नातेवाईक मदारसाब नन्हुसाब पठाण यांनी पालम पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. शेतातील उसाच्या पिकाचे रानडुकरांपासून संरक्षण करण्यासाठी शेताभोवती तारा लावून त्यामध्ये विद्युत प्रवाह सोडण्यात आला होता. हा विद्युत प्रवाह वेळेवर बंद न केल्याने आशाबी पठाण यांचा तारेला स्पर्श झाला आणि त्यांना विजेचा धक्का बसला. पत्नीला वाचविण्यासाठी धाव घेतलेल्या महेबुब पठाण यांनाही विद्युत प्रवाहाचा जोरदार धक्का बसला. या दुर्घटनेत दोघांचाही मृत्यू झाला. या प्रकरणी पालम पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोखंडे करीत आहेत. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### गंगाखेडातील वारकरी माऊलींसाठीच्या सात दिवसीय आरोग्य सेवा शिबिराचा समारोप

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** येथील सवंगडी कट्टा सामाजिक समुहाच्यावतीने पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या वारकरी माऊलींसाठी आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय मोफत आरोग्य सेवा शिबिराचा सांगता समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. वारकरी परंपरेप्रती आदरभाव आणि सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला वारकऱ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

७ जुलैपासून सुरू झालेल्या या सेवा उपक्रमात वारकरी माऊलींना मोफत वैद्यकीय तपासणी, औषधोपचार, प्रथमोपचार तसेच विविध आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. संत जनाबाईंच्या जन्मभूमी असलेल्या गंगाखेड नगरीत वारकऱ्यांना प्रेम, आपुलकी आणि सेवाभावाचा अनुभव देण्याचा प्रयत्न या शिबिरातून करण्यात आला. यंदा या सेवायज्ञाचे सलग ११ वे वर्ष पूर्ण झाल्याने सांगता समारंभ विशेष उत्साहात पार पडला. यावेळी सेवाकार्यात मोलाचे योगदान देणारे डॉक्टर, स्वयंसेवक, देणगीदार, सेवाभावी नागरिक तसेच सवंगडी कट्टा सामाजिक समूहातील सदस्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. उपस्थितांनी वारकरी परंपरेचे जतन, सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ वैद्यकीय चिकित्सक डॉ. शांतीलाल काबरा होते. प्रमुख पाहुणे म्हणून हृदयरोग तज्ज्ञ डॉ. हेमंत मुंढे, संत जनाबाई संस्थानचे सचिव डॉ. दिनकर मुंढे, ज्येष्ठ वैद्यकीय चिकित्सक डॉ. संजय भरड, स्त्रीरोग तज्ज्ञ तथा जिल्हा परिषद सदस्या डॉ. शोभा कदम, सामाजिक कार्यकर्त्या मंजू दर्डा, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अर्चना निरस, वैद्यकीय अधिकारी कैलास चांदकर तसेच समाजसेवक प्रभाकर आप्पा दावलबाजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी सवंगडी कट्टा सामाजिक समूहाच्या सातत्यपूर्ण समाजोपयोगी कार्याचे कौतुक केले. समाजातील गरजू घटकांसाठी आणि वारकरी बांधवांच्या सेवेसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सवंगडी कट्टा सामाजिक समूहातील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### काही एक्स्प्रेस गाड्यांच्या वेगात वाढ; सुधारित वेळापत्रक जाहीर : दक्षिण मध्य रेल्वेचा निर्णय; जुलै व सप्टेंबरपासून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी

**परभणी,/प्रतिनिधी:** प्रवाशांना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासह रेल्वे परिचालन कार्यक्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेने काही महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांच्या वेगात वाढ करून त्यांचे वेळापत्रक सुधारित केले आहे. हे सुधारित वेळापत्रक जुलै आणि सप्टेंबर २०२६ पासून टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येणार आहे. सुधारित वेळापत्रकानुसार नांदेड-संतरागाछी-नांदेड एक्स्प्रेस (क्रमांक १२७६७/१२७६८) नांदेडहून २० जुलैपासून तर संतरागाछीहून १६ सप्टेंबरपासून नव्या वेळापत्रकानुसार धावणार आहे. या बदलामुळे नांदेड, मुदखेड आणि हिमायतनगर स्थानकांवरील वेळांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. पूर्णा-पाटणा-पूर्णा एक्स्प्रेस (क्रमांक १७६१०/१७६०९) पूर्णाहून १६ जुलैपासून आणि पाटणाहून १९ सप्टेंबरपासून सुधारित वेळापत्रकानुसार धावेल. नांदेड, हिमायतनगर, सहस्त्रकुंड, किनवट आणि आदिलाबाद स्थानकांवरील वेळेत बदल करण्यात आला आहे. गुंटूर-छत्रपती संभाजीनगर एक्स्प्रेस (क्रमांक १७२५३) १० ऑगस्टपासून नव्या वेळापत्रकानुसार धावणार असून परळी वैजनाथ, गंगाखेड, परभणी, मानवत रोड, सेलू, परतूर, जालना आणि छत्रपती संभाजीनगर स्थानकांवरील वेळेत सुधारणा करण्यात आली आहे. या बदलाबाबत प्रभावित प्रवाशांना संदेशाद्वारे माहिती दिली जाणार आहे. फिरोजपूर कॅन्ट-नांदेड-फिरोजपूर कॅन्ट एक्स्प्रेस (क्रमांक १४६२२/१४६२१) फिरोजपूरहून १७ जुलैपासून आणि नांदेडहून १९ जुलैपासून सुधारित वेळापत्रकानुसार धावणार आहे. नांदेडसह पूर्णा, परभणी, सेलू, जालना आणि छत्रपती संभाजीनगर स्थानकांवरील वेळेतही बदल करण्यात आला आहे. तसेच विशाखापट्टणम-नांदेड एक्स्प्रेस (क्रमांक २०८११) या गाडीची नांदेड येथे आगमनाची वेळ १४ जुलैपासून दुपारी १.४५ ऐवजी १.४० करण्यात आली आहे. संबलपूर-नांदेड एक्स्प्रेस (क्रमांक २०८०९) या गाडीची नांदेड येथे आगमनाची वेळही १७ जुलैपासून दुपारी १.४५ ऐवजी १.४० करण्यात आली आहे. दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांना प्रवासाचे नियोजन करताना सुधारित वेळापत्रकाची नोंद घेण्याचे आवाहन केले असून अधिक माहितीसाठी रेल्वे चौकशी सेवा अथवा संबंधित रेल्वे स्थानकाशी संपर्क साधावा, असे कळविले आहे.

### प्रकल्पग्रस्त कृती समितीचे विद्यापीठ गेटसमोर आमरण उपोषण सुरू

**परभणी,/प्रतिनिधी:** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील प्रलंबित प्रश्नांबाबत प्रकल्पग्रस्त कृती समितीच्या वतीने मंगळवार १४ जुलैपासून विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. विविध मागण्यांबाबत यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊनही प्रशासनाकडून समाधानकारक निर्णय न झाल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे समितीने म्हटले आहे.

कृती समितीच्या निवेदनानुसार, प्रकल्पग्रस्तांसाठी काढण्यात आलेल्या भरती जाहिरातीस मुदतवाढ देण्यात येऊ नये, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच विद्यापीठातील कंत्राटी कुशल व अकुशल कामगारांना ठरावानुसार वेतनवाढ व ईएसआय सुविधा लागू कराव्यात, भरती प्रक्रियेतील परीक्षांचे वेळापत्रक तातडीने जाहीर करावे आणि ज्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांची प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रे जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत, त्यांना कागदपत्र पडताळणीच्या अधीन राहून अर्ज करण्यास परवानगी द्यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.

# येलदरीतील पाणी साठ्यावर परिणाम

**जिवंत साठयात किरकोळ वाढ, शेतकरी चिंतेत**



**मोहन धारासूरकर**
**परभणी ,/प्रतिनिधी:-** पावसाळा सुरू होऊन दीड महिन्याहून अधिक कालावधी लोटला असला तरी अपेक्षित पाऊस न झाल्याने येलदरी धरणातील पाणीसाठ्यात समाधानकारक वाढ झालेली नाही. जूनच्या अखेरीस ५१.०८ टक्के असलेला जिवंत पाणीसाठा जुलैच्या दुसऱ्या आठवड्यातही जवळपास त्याच पातळीवर कायम असून धरणातील पाणीसाठा ठप्प झाल्याचे चित्र आहे.

जलसंपदा विभागाच्या आकडेवारीनुसार २६ जून रोजी येलदरी धरणात ५१.०८ टक्के जिवंत पाणीसाठा उपलब्ध होता. त्यानंतर ३ जुलै रोजी तो ५२.१७ टक्क्यांवर पोहोचला. ८ जुलै रोजी जिवंत साठा ५२.२६ टक्के झाला होता. मात्र १२ जुलै रोजी पुन्हा जिवंत साठा ५२.१७ टक्क्यांवर आला आहे. गेल्या पंधरा ते वीस दिवसांमध्ये धरणातील पाणीसाठ्यात कोणतीही लक्षणीय वाढ झालेली नसल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

दरम्यान, खरीप हंगामाची कामे अंतिम टप्प्यात असताना आणि पिकांना पाण्याची आवश्यकता वाढत असताना धरणातील पाणीसाठ्यात वाढ होत नसल्याने शेतकरी वर्गात चिंता व्यक्त केली जात आहे.

येलदरी धरणावर परभणी, हिंगोलीसह परिसरातील अनेक गावांचे पिण्याचे पाणी व सिंचन व्यवस्था अवलंबून असल्याने येत्या काही दिवसांत चांगला पाऊस होणे अत्यावश्यक मानले जात आहे.

> **येलदरी धरणात ५२.१७ टक्के जिवंत पाणीसाठा..**
> **येलदरी धरणात सध्या ५२.१७ टक्के जिवंत पाणीसाठा उपलब्ध असून धरणातील एकूण पाणीसाठा ५४७.१२४ दलघमी इतका नोंदविण्यात आला आहे. धरणाची पाणीपातळी ४५७.४६० मीटर असून ती अद्याप ईशारा पातळी आणि धोका पातळीपेक्षा कमी आहे. धरणाची एकूण साठवण क्षमता ९३४.४४० दलघमी असून त्यापैकी मृत पाणीसाठा १२४.६७० दलघमी आणि जिवंत पाणीसाठा ८०९.७७० दलघमी आहे. सध्या धरणात ४२२.४५४ दलघमी जिवंत साठा उपलब्ध आहे. गेल्या २४ तासांत धरण क्षेत्रात १६.२७८ दलघमी पाण्याची आवक झाली. तर चालू हंगामात धरण क्षेत्रात आतापर्यंत एकूण १९२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.**

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आज परभणी दौऱ्यावर

**परभणी,/प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे हे गुरुवार १६ जूलै रोजी सकाळी परभणी शहराच्या दौऱ्यावर दाखल होणार आहेत.

बुधवारी रात्री ते परभणीत मुक्कामी दाखल होणार असून गुरुवारी सकाळी १० वाजता ते खानापूर फाट्याजवळील राष्ट्रवादी भवनात आयोजित केलेल्या परभणी महानगर व ग्रामीण पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीस उपस्थित राहणार आहेत. ग्रामीण जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे व शहर जिल्हाध्यक्ष अब्दुल रशीद यांनी या बैठकीचे आयोजन केले.

### कत्तलखाने व मांसाहारी मद्यपान दुकाने बंद ठेवा

**परभणी,/प्रतिनिधी:** २२ जूलै रोजी शुध्द देशी गोवंश जतन आणि गोसंवर्धन दिन सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच शाळा व महाविद्यालयात साजरा करावा व त्या दिवशी सर्व कत्तलखाने, मांसाहारी व मद्यपान दुकाने बंद ठेवावीत, अशी मागणी येथील गोरक्षक सेनेने तहसीलदारांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. गोरक्षक सेनेचे मराठवाडा अध्यक्ष नितीन जाधव व उपाध्यक्ष योगगुरु चंपालाल ठाकूर, गोभक्त भागवत पहेलवान बोबडे व अन्य सदस्यांनी स्थानिक तहसीलदारांना सादर केलेल्या निवेदनातून या शुध्द देशी गोवंश जतन गोसंवर्धन दिनानिमित्त सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच शैक्षणिक संस्थांसह स्थानिक स्वराज्य संस्थांमधून गोमातेचे पुजन किंवा प्रतिमेचे पुजन करावे, त्या दिवशी कत्तलखाने, मांसाहारी दुकाने बंद ठेवावीत, तसेच गोमाता, नंदीबैल पशूंसाठी शिबीरे व चर्चासत्रे राबविण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.



### मानवतमध्ये अवैध देशी दारू विक्रीवर पोलिसांचे दोन धाडसत्र; दोघांविरुद्ध गुन्हे दाखल

**मानवत/प्रतिनिधी-** मानवत शहरात अवैध देशी दारू विक्री करणाऱ्यांविरोधात मानवत पोलिसांनी धडक कारवाई करत दोन स्वतंत्र ठिकाणी छापे टाकून देशी दारूचा साठा जप्त केला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जुलै रोजी दुपारी मानवतपरभणी मार्गावरील राघवेंद्र जिनिंगसमोरील सार्वजनिक रस्त्यावर छापा टाकण्यात आला. यावेळी दीपक पांडुरंग वाघमारे (वय ३२, रा. आंबेडकर नगर, मानवत) याच्या ताब्यातून 'भिंगरी संत्रा' देशी दारूच्या १८० मिलीच्या आठ सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. जप्त मुद्देमालाची किंमत ६४० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.
त्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी आठवडी बाजार परिसरातील उमेश ड्रेसेस शेजारील सार्वजनिक रस्त्यावर आणखी एक कारवाई करण्यात आली. या वेळी बल्लुसिंग दरबारसिंग बावरी (वय ४१, रा. पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ, मानवत) याच्याकडून 'भिंगरी संत्रा' देशी दारूच्या १८० मिलीच्या ११ सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. या मुद्देमालाची किंमत ८८० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.
दोन्ही कारवाया गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आल्या असून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पंचांसमक्ष ताब्यात घेण्यात आला. या दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास मानवत पोलीस ठाण्यात सुरू आहे.

**अवैध दारू विक्रेत्यांवर पोलिसांचा वॉच**
**मानवत शहरात सार्वजनिक ठिकाणी अवैध देशी दारूची विक्री होत असल्याच्या तक्रारी वाढत असताना पोलिसांनी सलग दोन कारवाया करून दारू विक्रेत्यांना इशारा दिला आहे. अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत.**

## जिंतूर तालुक्यात स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया तात्काळ स्थगित करा-भाबंळे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यात स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया तात्काळ स्थगित करा दिनांक १४/७/२०२६ रोजी जिंतूर येथे उपकार्यकारी अभियंता महावितरण यांना माजी आमदार विजयरावजी भांबळे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्यांचे निवेदन देण्यात आले.
१.ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया तात्काळ थांबवावी. २.प्रत्येक ग्राहकाला मीटर बदलण्यापूर्वी लेखी किंवा एसएमएस द्वारे पुरेशी पूर्व सूचना देण्यात यावी. ३.स्मार्ट मीटर मुळे ग्राहकावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, याबाबत लेखी हमी देण्यात यावी.४.स्मार्ट मीटर मध्ये बिलिंग, रीडिंग व तांत्रिक बाबी बाबत सार्वजनिक जनजागृती मोहीम राबवण्यात यावी. ५.मीटर मध्ये बिघाड किंवा चुकीचे बिल आल्यास स्वतंत्र व जलद तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी.६.मीटर बदलताना जुन्या व नव्या मीटरची रिडींग ग्राहकाला लेखी स्वरूपात देण्यात यावी. ७.उच्च न्यायालयातील प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत ग्राहकांचे विरुद्ध स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती करू नये. तसेच जिंतूर शहर व ग्रामीण भागातील विजेच्या अनेक समस्यांचे प्रश्न यावेळी उपअभियंता महावितरण जिंतूर यांना मांडण्यात आले, तसेच भारनियमन कमी करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी विश्वनाथ राठोड, अजय चौधरी, कृष्णकांत देशमुख, शंकर जाधव, माणिक हरकळ, लक्ष्मण बुधवंत,बाळासाहेब भांबळे, मुरलीधर मते, गणेश इलग,दत्ता काळे , शौकत लाला ,रफिक बेग,अभिजित भांबळे, सचिन राऊत,विश्वंभर पवार,राहुल घुले,प्रवीण चव्हाण ,ग्रामीण तसेच शहरातील अनेक नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थित होती.

## जिंतूरचे शासकीय दूध संकलन केंद्र झाले बकाल बारा वर्षापासून दूध व्यवसाय बंद

**गंगाखेड ,/प्रतिनिधी- :** र्जिंतूर तालुक्यातील औंढा रोडवरील पुंगळा औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या शासकीय दूध संकलन व शीतकरण केंद्राच्या इमारतीची अतिशय दुरवस्था झाली असून, लोखंडी शटर जागोजागी सडले आहे. परिसरात प्रचंड घाण साचल्यामुळे या केंद्राला बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेली इमारत, कर्मचाऱ्यांसाठीची निवासस्थाने आता अखेरची घटका मोजत आहे. जिल्हाधिकारी व जिल्हा दूध उत्पादक अधिकारी यांनी केंद्र चालू करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

शासकीय दूध विकास विभाग व जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघाच्या निष्क्रिय व भोंगळ कारभारामुळे तालुक्यातील ३५ वर्षांपूर्वीच्या जुन्या शासकीय दूध संकलन केंद्रात लाखोची यंत्रसामग्री भंगार झाली आहे. तालुक्यातील शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून असल्याने शेती व्यवसायासाठी कोरडवाहू क्षेत्राचे प्रमाण जास्त आहे. शेतीला जोड धंदा म्हणून तालुक्यातील १६९ गावातील

> **दूध व्यवसाय कसा वाढ होणार शेतकरी वर्गामधून तीव्र नाराजी**

जवळपास १२५ गावांतील शेतकरी दूध व्यबसाय करतात. तालुक्यातील दूध संकलन केंद्र सुरू करण्यासाठी प्रशासनाची उदासीनता कारणीभूत ठरत आहे. या दूध संकलन केंद्राची वाट लावण्यात कोणीच कमी पडले नसल्याची बाब समोर आली आहे. दूध संघ, दूध संकलन केंद्र, बर्फाचा कारखाना
या सर्व गोष्टी उपलब्ध असतानाही केवळ कागदोपत्री आकड्यांची जमवाजमव करून दूध संकलन केंद्र बंद पाडण्याचा प्रकार त्यावेळी झाला आहे. तर या दूध संकलन केंद्रातील मशीनरी व इतर साहित्य संकलन केंद्र चालू असताना इतर ठिकाणच्या दूध संकलन केंद्रामध्ये हलविण्यात आली आहे. त्यानंतर हे दूध संकलन केंद्र कायमचे बंद करण्यात आले. यामुळे ३५ वर्षांपासून तालुक्यातील दूध व्यवसायास गळती लागली आहे. शेतकऱ्यांचा कैवारी ठरलेले व दूधगंगा म्हणून ओळखले जाणारे केंद्र आता शेवटची घटका मोजत आहे. आताच्या राजकीय पुढाऱ्यांनी तरी या दूध शीतकरण व संकलन केंद्राच्या पुनर्जीवन करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तालुक्यात शासकीय दूध संकलन केंद्र नसल्यामुळे अनेक खासगी दूध संकलन केंद्रे सुरू झाली आहेत. परंतु, त्यांची दूध खरेदी ठराविक असल्यामुळे शिल्लक दुधाची विक्री दूध व्यवसायिकांना कवडीमोल भावाने करावी लागत आहे.

अनेक गावांमध्ये बेरोजगार युवकांनी गाई-म्हशी घेऊन दूध विक्री व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू केला आहे. परंतु, दूध संकलन खासगी व्यावसायिक आपल्या मनमानी पद्धतीने दूध संकलन करत असल्याने अनेकांना आपला व्यवसाय कायमचा बंद करावा लागला. कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेली इमारत, कर्मचाऱ्यांसाठीची निवासस्थाने आतां अखेरची घटका मोजत आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरसाठी विशेष रेल्वेगाड्यांची घोषणा

**नांदेड विभागातील भाविकांना दिलासा; परभणी, पूर्णा, नांदेडमार्गे धावणार विशेष गाड्या**

**परभणी ,/प्रतिनिधी-:** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे होणाऱ्या यात्रेसाठी होणारी अतिरिक्त प्रवासी गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष गाड्यांमुळे नांदेड विभागातील भाविकांना पंढरपूरला जाण्यासाठी अतिरिक्त सुविधा उपलब्ध होणार आहे.

रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या माहितीनुसार नगरसुल-पंढरपूर, पंढरपूर-जालना, आदिलाबाद-पंढरपूर-मिरज, मिरज-पंढरपूर-आदिलाबाद तसेच अकोला-पंढरपूर आणि पंढरपूर-अकोला या विशेष गाड्या २४ व २५ जुलै रोजी चालविण्यात येणार आहेत.

नगरसुल-पंढरपूर विशेष गाडी (क्रमांक ०७६३१) २४ जुलै रोजी नगरसुल येथून सुटून छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर मार्गे पंढरपूरला पोहोचणार आहे. तर पंढरपूर-जालना विशेष गाडी (क्रमांक ०७६३२) २५ जुलै रोजी पंढरपूरहून सुटून परभणी, मानवत रोड, सेलू व परतूरमार्गे जालना येथे पोहोचेल.

आदिलाबाद-पंढरपूर-मिरज विशेष गाडी (क्रमांक ०७६३३) २४ जुलै रोजी आदिलाबादहून सुटून किनवट, हिमायतनगर, नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर व पंढरपूरमार्गे मिरजपर्यंत धावणार आहे. याच मार्गावर मिरज-पंढरपूर-आदिलाबाद विशेष गाडी (क्रमांक ०७६३४) २५ जुलै रोजी चालविण्यात येणार आहे.

तसेच अकोला-पंढरपूर विशेष गाडी (क्रमांक ०७६३५) २४ जुलै रोजी अकोलाहून सुटून हिंगोली, बसमत, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ मार्गे पंढरपूरला जाणार आहे. परतीच्या प्रवासासाठी पंढरपूर-अकोला विशेष गाडी (क्रमांक ०७६३६) २५ जुलै रोजी पंढरपूरहून सुटून परभणी, पूर्णा, बसमत, हिंगोली मार्गे अकोल्याला पोहोचेल.

आषाढी यात्रेसाठी मोठ्या संख्येने भाविक पंढरपूरकडे रवाना होत असल्याने या विशेष गाड्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे. यात्रेकरूंनी आरक्षण व प्रवासाचे नियोजन वेळेत करून घ्यावे, असेही रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

दरम्यान पंढरपूरला जाणाऱ्या सर्व गाडयांसाठीची व्यवस्था रेल्वे प्रशासनाच्यावतीने कररण्यात आलेली आहे.त्यामुळे येत्या एक ते दोन दिवसांत ज्यादा डब्बे वाढविण्याची देखील तयारी रेल्वे प्रशासन करण्याच्या विचाराधीन आहे.

